रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड । शुक्रवार । दि. ३ जुलै २०२६ । अंक २७ । पृष्ठे १० । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## रेवदंड्यात गांजा विक्रेत्यावर छापा

**रायगड :** गांजा विक्री करणाऱ्यासह बाळगणाऱ्यांच्या विरोधात मुरूड पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत सुमारे ३३ ग्रॅम वजनाचा गांजाचा साठा सापडला असून चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये रेवदंड्यातील गांजा माफियादेखील पोलिसांच्या जाळ्यात सापडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुरूडमध्ये ११ ग्रॅम वजनाचा गांजा पोलिसांना सापडला.बेकायदेशीररित्या गांजा बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली होती. आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्यांची कसून चौकशी केल्यावर रेवदंडा येथून गांजा आणल्याची कबुली दिली.

## माफियाच्या घरात लाखोंचा गुटखा?

**रायगड :** अलिबागमधील संगम परिसरातील गुटखा माफियाच्या घरात लाखोंचा गुटखा सापडला. अलिबाग पोलीसांसह अन्न व औषध प्रशासनाने गुरुवारी (दि.२) दुपारी ही संयुक्त कारवाई केली. या कारवाईने गुटखा विक्रेत्यांना दणका मिळाला आहे. सुमारे एक लाखहून अधिक रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांना मिळाली होती. आरोपी गेल्या अनेक वर्षापासून परिसरात गुटखा विक्रीचा गोरखधंदा चालवित आहे. त्याच्याविरोधात यापुर्वीदेखील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ४० वारकऱ्यांसाठी गावातूनच लालपरी



एसटी महामंडळाची घोषणा; तब्बल 5,500 विशेष गाड्यांची सोय

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सुकर प्रवासासाठी एसटीने दिलासादायक निर्णय घेतला आहे. राज्यातील कोणत्याही गावातून किमान ४० किंवा त्यापेक्षा अधिक वारकरी एकत्र आल्यास, त्यांना थेट त्यांच्या गावातूनच पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. वारीसाठी एसटीने साडेपाच हजार विशेष बसचे नियोजन केले आहे.

दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरला रवाना होत असतात. या काळात प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने यंदा राज्यभरातून ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ वारीच्या काळातही प्रवाशांना मिळणार आहे. अमृत ज्येष्ठ नागरिक योजना अंतर्गत ७५ वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना एसटी बसमधून पूर्णपणे मोफत प्रवासाची सुविधा असेल. तसेच महिला सन्मान योजनेअंतर्गत सर्व महिला प्रवाशांना तिकिटाच्या दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील महिला आणि वृद्ध वारकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

### वारकऱ्यांसाठी विशेष सुविधा

वारीच्या काळात होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळातर्फे तात्पुरती बसस्थानके उभारली जाणार आहेत. या बसस्थानकांवर भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून पिण्याचे शुद्ध पाणी, सुसज्ज स्वच्छतागृहे, आपत्कालीन आरोग्य सुविधा आणि माहिती केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रवाशांना योग्य दिशा समजावी यासाठी ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात येणार असून मदतीसाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## वेधक

### पनवेलमधून १८ किलो गांजा जप्त

**पनवेल :** पनवेल शहर पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधातील कारवाईत मोठे यश मिळवत १८ किलो ८०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून दोन आरोपींना अटक केली आहे. जप्त केलेल्या गांजाची अंदाजे किंमत २ लाख २२ हजार ८० रुपये इतकी आहे. पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास पनवेल रेल्वे स्थानकाच्या परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या दोघांची तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडील पिशव्यांची झडती घेतली असता गांजा आढळून आला. तात्काळ दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत आरोपींकडून १८ किलो ८०० ग्रॅम गांजा, तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या साहित्यांसह मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### बसचा अपघात; १५ विद्यार्थी जखमी

**रत्नागिरी :** मिरजोळेउक्षी मार्गावरील फणसवले पवारकोंड येथे गुरुवारी (दि.२) सकाळी साडेसातच्या सुमारास दोन बसची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या पटवर्धन हायस्कूल व महाविद्यालयातील १५ विद्यार्थी-विद्यार्थिनी जखमी झाले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, एका बसचालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. या अपघातात सुजल सनगरे (१७), सिद्धेश खापणे (१७), तन्वी रेवाळे (१६), आदिती सत्यवान कांबळे (१७), तेजस्विनी अशोक खापणे (१७), कल्याणी रेवाळे (१७) यांच्यासह एकूण १५ विद्यार्थी-विद्यार्थिनी जखमी झाले आहेत.

### मॅनहोलमध्ये पडून एकाचा मृत्यू

**साकीनाका :** साकीनाका येथे उघड्या मॅनहोलमध्ये पडलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याने मुंबई महापालिकेच्या निष्काळजी कारभारावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उघडे मॅनहोल, त्यावर संरक्षक जाळी नसणे आणि प्रशासनाला याची माहिती नसल्याची बाब समोर आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सकाळी सुमारे १० ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. संबंधित व्यक्ती मोबाईलवर बोलत असताना पाण्याखाली झाकलेल्या मॅनहोलमध्ये पडल्याची माहिती महापौर रितू तावडे यांनी दिली होती. घटनास्थळी त्या व्यक्तीची छत्री आणि चप्पल सापडल्यानंतर बचावकार्य सुरू करण्यात आले होते.

# प्रशासनाच्या शिस्तीचा फज्जा

**45 पैकी 35 कर्मचारी अजूनही प्रतिनियुक्तीवरच**





## जि.प. सीईओंचे आदेश धाब्यावर

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (सीईओ) दिलेल्या आदेशांना खुलेआम हरताळ फासल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

प्रतिनियुक्ती रद्द करून ४५ कर्मचाऱ्यांना मूळ विभागात परतण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले असताना, त्यापैकी केवळ १० कर्मचाऱ्यांनीच आदेश पाळले असून उर्वरित ३५ कर्मचारी अद्यापही प्रतिनियुक्तीच्या ठिकाणीच ठाण मांडून बसल्याचे उघड झाले आहे. १७ एप्रिल २०२४ रोजी जारी करण्यात आलेल्या या आदेशांना २ मे २०२४ पर्यंत अंमलात आणण्याची मुदत देण्यात आली होती. मात्र मुदत संपूनही बहुसंख्य कर्मचाऱ्यांनी आदेश धुडकावल्याने जिल्हा परिषद प्रशासनाची अधिकारशाहीच प्रश्नचिन्हात आली आहे. ही माहिती माहिती अधिकारातून सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी मिळवलेल्या कागदपत्रांतून समोर आली आहे. आदेश स्पष्ट असूनही त्याची अंमलबजावणी न होणे, हे प्रशासनातील शिस्तीचा उघड भंग मानला जात आहे.

प्रतिनियुक्ती वर्षानुवर्षे सुरू राहिल्याने मूळ विभागांमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता निर्माण झाली आहे. ग्रामीण विकास, आरोग्य आणि शिक्षण यांसारखे महत्त्वाचे विभाग अक्षरशः कर्मचारी टंचाईने त्रस्त आहेत. परिणामी सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर थेट परिणाम होत असल्याचे चित्र आहे. या संपूर्ण प्रकरणाने प्रशासन चालवतो कोण? असा प्रश्न उभा केला असून, आदेश देणारे अधिकारीच दुर्लक्षित होत असल्याची चर्चा जोर धरत आहे. काही कर्मचाऱ्यांना राजकीय पाठबळ मिळत असल्याचा आरोपही आता उघडपणे होत आहे.सीईओंचे आदेश जर कागदावरच राहणार असतील, तर जिल्हा परिषदेतील प्रशासनिक यंत्रणा कोलमडली आहे का, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. सीईओ पुढे कोणती कठोर कारवाई करतात की हे प्रकरणही दडपले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### वरदहस्त कुणाचा?

या प्रकरणात काही कर्मचाऱ्यांना ‘वरदहस्त’ असल्याचीही जोरदार चर्चा असून, त्याचाच परिणाम म्हणून आदेश धाब्यावर बसवले जात असल्याचा आरोप होत आहे. आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांचीच कोंडी होत असेल, तर प्रशासकीय यंत्रणा नेमकी कोणाच्या नियंत्रणात आहे, हा सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक वर्षे जिल्हा परिषदेच्या ठराविक विभागांमध्ये तेच तेच चेहेरे पहावयास मिळत आहेत. या चेहऱ्यांना दिल्या जाणाऱ्या खुर्च्या अर्थपूर्ण विषयांमुळेच दिल्या जात असल्याची चर्चा आहे.

### महत्वाचे मुद्दे

- ४५ पैकी फक्त १० कर्मचारीच मूळ विभागात हजर
- ३५ कर्मचारी अद्याप प्रतिनियुक्तीवरच कार्यरत
- १७ एप्रिल २०२४ रोजी प्रतिनियुक्ती रद्द आदेश
- २ मे २०२४ पर्यंत अंमलबजावणीची मुदत
- माहिती अधिकारातून खुलासा
- ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण विभागांवर परिणाम
- प्रशासकीय शिस्तीवर गंभीर प्रश्नचिन्हे
- राजकीय हस्तक्षेपाची चर्चा

# नैसर्गिक पाण्याचा मार्ग अरुंद

- **आंबेघर, पेझारी येथील शेतजमीन पाण्याखाली**
- **अलिबागच्या तहसीलदारांकडे ग्रामस्थांसह शेतकऱ्यांची तक्रार**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नैसर्गिक पाण्याचा मार्ग खुले ठेवण्याच्या अटीवर सीएनजी पंप सुरु करण्याची परवानगी दिली होती. मात्र त्या अटीचे उल्लंघन करून नैसर्गिक पाण्याचा रुंद मार्ग बांधकामाने अरुंद करण्यात आला आहे. त्याचा फटका आंबेघर, पेझारी परिसरातील भातशेतीला बसला आहे. अनेक घरांमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला असल्याची तक्रार करण्यात आली आहे. अलिबागमधील तहसीलदार विक्रम पाटील यांच्याकडे बुधवारी (दि.१) दुपारी निवेदन देऊन बांधकामावर स्थगिती आणून अतिक्रमण हटविण्यात यावे अशी मागणी केली आहे.

यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, अलिबाग पंचायत समितीच्या सदस्या अंजली ठाकूर, दिगंबर म्हात्रे, स्नेहलता लडगे, मोहन म्हात्रे, प्रमोद घासे, अंबरनाथ पाटील, बाळाराम दांडेकर, निलेश चवरकर, मोहन ओव्हाळ, सुधाकर पाटील, उमेश म्हात्रे, चंद्रकांत पाटील, देविदास म्हात्रे, सुर्यकांत पाटील, महेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

पेझारी ग्रामपंचायत हद्दीतील व आंबेघर येथील ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आलेल्या तक्रारीनुसार, आंबेघर येथील शेतजमीन धारक मोकल यांनी पेझारी ते पळी मार्गावर सीएनजी, पेट्रोल पंपाचे बांधकाम केले आहे.पेझारी येथील पुर्वपरंपरागत नाल्यापासून मोकल यांच्या शेतीला लागून नैसर्गिक पाण्याचा मोठा नाला(मार्ग) होता. पेट्रोल पंपाच्या बांधकामामुळे नाल्याचा मार्ग अरुंद करण्यात आला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पान २ वर

## महाडमध्ये एनडीआरएफ तैनात; ३२ जवान दाखल

**■ पूर व दरडग्रस्त भागात कॅम्प**

**। महाड । प्रतिनिधी ।**

नैसर्गिक आपत्ती आणि महापुराच्या पार्श्वभूमीवर ३२ जवानांचे एनडीआरएफ पथक काल रात्री उशिरा महाडमध्ये दाखल झाले आहे. मागील काही वर्षांतील पूरस्थिती आणि दरडी कोसळण्याच्या घटनांचा विचार करून पावसाळ्यात एनडीआरएफ पथक महाडमध्ये तैनात ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दस्तुरी नाक्यावरील रमा विहार येथे या पथकाचा कॅम्प उभारण्यात आला आहे. या पथकासोबत अद्ययावत बचावसामग्री, चार फायबर होड्या, वायरलेस सेट, श्वान पथक तसेच अन्य अत्यावश्यक उपकरणांचा समावेश आहे. आगामी काळात हे पथक महाड आणि

पान २ वर

## २६ जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट

**मुंबई :** हवामान विभागाने राज्यातील एकूण २६ जिल्ह्यांसाठी विविध स्तरांचे पावसाचे अलर्ट जारी केले आहेत. रायगड जिल्हा आणि पुणे घाट परिसराला रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर, नऊ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट आणि १९ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान गुरूवारी पावसाने रायगड जिल्ह्यात मुसळधार सुरूवात करून वातावरणात गारवा आणला.

## अपघातात तरुणी ठार, तरुण जखमी

**सुडकोली-नवखार डुंगी येथे भीषण दुर्घटना**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।**

सुडकोली-नवखार डुंगी दरम्यान दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये तरुणीचा जागीच मृत्यू झाला. तर तरुणाला गंभीर दुखापत झाली. ही घटना गुरुवारी (दि.२) दुपारी घडली. दुचाकीवरील ताबा सुटल्याने अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे. जखमीला उपचारासाठी अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

वृषाली वाघमारे आणि ईश्वर पवार हे दोघे अलिबागहून रोहाकडे सकाळी दुचाकीवरून निघाले. अलिबाग-रोहा मार्गावरील सुडकोली ते नवखारची डुंगी या रस्त्याजवळ दुपारी बारा-साडेबारा वाजण्याच्या सुमारास आल असता दुचाकीवरील ताबा सुटल्याने भीषण अपघात झाला. त्यामध्ये वृषाली ही तरुणी रस्त्याच्या बाजूला असलेल्या नाल्यात पडली. रोशनही रस्त्याच्या बाजूला पडला. वृषालीला प्रचंड दुखापत झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे यांच्यासह पोलीस हवालदार मनीष ठाकूर यांनी घटनास्थळी धाव घेतली. वृषाली वाघमारेचा मृतदेह ताब्यात घेऊन ईश्वर पवारला अधिक उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात रुग्णवाहिकेद्वारे पाठविले.

# देहेनला मिळाला पर्यायी पूल

**चित्रलेखा पाटील यांच्या इशाऱ्यानंतर सा.बा.विभागाची हालचाल**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

देहेन-भाकरवड गावांना जोडणाऱ्या अपूर्ण पुलामुळे आणि पहिल्याच पावसात वाहून गेलेल्या तात्पुरत्या बंधाऱ्यामुळे दोन्ही गावांचा संपर्क तुटला होता. या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला पाच दिवसांत पर्यायी व्यवस्था करण्याचा अल्टिमेटम देत आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर विभागाने तातडीने दखल घेत पर्यायी पुलाची उभारणी केली. त्यामुळे ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



देहेन-भाकरवड जोडणारा पूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असून त्याच्या बांधकामासाठी शासनाने सुमारे दीड कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सप्टेंबरमध्ये कामाला सुरुवात झाली होती. मात्र वाहतुकीसाठी उभारण्यात आलेला तात्पुरता बंधारा पावसाच्या पहिल्याच सरीत वाहून गेल्याने दोन्ही गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला. या परिस्थितीची माहिती मिळताच चित्रलेखा पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या. पुलाच्या रखडलेल्या कामाबाबत त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर तीव्र नाराजी व्यक्त करत, पाच दिवसांत पर्यायी पूल उभारला नाही तर विभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला होता. या इशाऱ्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने हालचाल करत पर्यायी पुलाचे काम पूर्ण केले. पुलावरून वाहतूक सुरू झाल्याने देहेन आणि भाकरवड गावांतील नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न तात्पुरता मार्गी लागला आहे. दरम्यान, मुख्य पुलाचे कामही पावसाळ्यानंतर तातडीने पूर्ण करून नागरिकांना कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## शिक्षकांच्या खांद्यावर सरकारचं ओझं

**■ बीएलओ कामादरम्यान शिक्षकाला हृदयविकाराचा झटका**

**। पेण । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाच्या विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (बीएलओ) प्रशिक्षणादरम्यान पेणमधील नगरपालिका शाळेतील शिक्षक आसिफ दळवी यांना हृदयविकाराचा झटका आल्याने शिक्षकांवर वाढत्या अशैक्षणिक कामांच्या ओझ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यांना तातडीने उपचारासाठी अंतोरेफाटा येथील म्हात्रे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.



पेण नगरपालिकेच्या सभागृहात सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान दळवी यांना चक्कर येऊन घाम फुटल्याने ते खाली कोसळले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेनंतर शिक्षकांवर सातत्याने सोपविण्यात येणाऱ्या निवडणूक, जनगणना, मतदार पुनरीक्षण, सर्वेक्षण आणि इतर अशैक्षणिक कामांबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुरुजींनी विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन करायचे की लोकसंख्या मोजत बसायचे? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

**विश्वास, सहकार आणि विकासाचा प्रवास** | **चार वर्षांत दुपटीपेक्षाही अधिक वाढ**

# आरडीसीसीची ८ हजार कोटींची विक्रमी झेप

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ८,००० कोटींच्या एकूण व्यवसायाचा ऐतिहासिक टप्पा पार करत सहकार क्षेत्रात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. विशेष म्हणजे, मागील अवघ्या चार वर्षांत बँकेच्या व्यवसायात दुपटीपेक्षाही अधिक वाढ झाली आहे. सहकाराच्या माध्यमातून ग्राहककेंद्री सेवा, आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि आधुनिक बँकिंगचा प्रभावी संगम साधणाऱ्या रायगड जिल्हा बँकेने हा टप्पा गाठत महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात राज्यातील आपले अग्रस्थान अधिक दृढ केले आहे.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा हा प्रवास केवळ व्यवसायवाढीचा नाही, तर गेल्या ६५ वर्षांत ग्राहक, सभासद, शेतकरी, महिला बचतगट, व्यापारी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण केलेल्या अढळ विश्वासाचा आहे. सहकार म्हणजे केवळ आर्थिक व्यवहार नसून, समाजाच्या विकासाची आणि लोकांच्या प्रगतीची चळवळ आहे, हे बँकेने आपल्या कार्यातून सातत्याने सिद्ध केले आहे.





त्यामुळेच आज रायगड जिल्हा बँकेचा विकासाचा प्रवास राज्यातील सहकार क्षेत्रासाठी प्रेरणादायी मानला जात असून, ८,००० कोटींचा व्यवसाय हा त्या विश्वासाचा आणि सातत्यपूर्ण कार्याचा भक्कम पुरावा ठरला आहे.

रायगड जिल्हा बँकेने गेल्या काही वर्षांत डिजिटल बँकिंग, कोअर बँकिंग प्रणाली, रुपे केसीसी कार्ड, स्वयं सहाय्यता गटांचे सक्षमीकरण, आधुनिक बँकिंग सुविधा आणि ग्राहकाभिमुख विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. यामुळे ग्रामीण भागातील ग्राहकांनाही आधुनिक बँकिंगचा लाभ मिळत असून, बँकेबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

याबाबत बँकेचे अध्यक्ष माजी आमदार जयंत पाटील यांनी यावेळी राज्यातील तसेच जिल्ह्यातील सहकारी संस्था, बँका,पतसंस्था, शासकीय आणि निमशासकीय आस्थापना यांचे विशेष आभार व्यक्त करताना बँकेच्या या यशामध्ये त्यांचा महत्वाचा सहभाग आहे असे आवर्जून नमूद केले. तसेच ८,००० कोटींचा व्यवसाय हा केवळ आर्थिक टप्पा नसून, रायगड जिल्ह्यातील ग्राहक, सभासद, शेतकरी आणि नागरिकांनी बँकेवर दाखविलेल्या अढळ विश्वासाचा सन्मान आहे असे प्रतिपादन केले.

बँकेचे


पान २ वर

# आंबेनळी घाटात बावळी येथे दरड कोसळली

**यंदाही आंबेनळी घाटरस्ता बंदीची अधिसूचना जारी होणार?**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील पायटा ते कुंभळवणे दरम्यान मंगळवारी रात्री दगड कोसळल्यानंतर गुरुवारी सकाळी पुन्हा दगड कोसळण्याची घटना बावळी टोक या ठिकाणी घडली.



पोलादपूर शहर, कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीअंतर्गत रानबाजिरे, काटेवाडी, सिध्दार्थनगर, भराववाडी, कापडे कमानीचा परिसर तसेच आड, चांभारगणी, कुंभळवणे, पायटे, दाभिळटोंक, बावळीटोक पर्यंतच्या या २४.२०० कि.मी. रस्त्याचे रूंदीकरण सुरू झाल्यानंतर अनेक ठिकाणी रस्त्याखालील मोऱ्यांसाठी खोदकाम करुन चौकोनी व गोलाकार काँक्रीटचे पाईप पुरुन कडेने काँक्रीटच्या मोऱ्यांचे बांधकाम करण्यात आले.

पोलादपूर महाबळेश्वर रस्त्याच्या सुधारणेचे काम कंत्राटदार आरपीपी-एसआयपीएल यांच्यामार्फत हाती घेण्यात आल्यापासून आंबेनळी घाटामध्ये ११ जुलै २०२५ रोजी सुरू झालेली घाटरस्ताबंदीची अधिसूचना घाट सुरू होण्यापूर्वीच १५ जुलैपासून १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली होती. आताही एका दिवसाआड आंबेनळी घाटामध्ये दरडी कोसळण्याच्या सलग दोन घटनांनंतर तहसीलदार घोरपडे यांनी या आंबेनळी घाटरस्त्यावरून वाहतूक करणाऱ्यांना दरडी कोसळण्याचे सातत्य लक्षात घेता वाहतुकदार आणि प्रवासी वाहनांनी आवश्यक वाटल्यास आंबेनळी घाटाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

# स्थानिकाना युवकांना रोजगारात प्राधान्य द्या

## ● ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी

| पाली /बेणसे | प्रतिनिधी|

पाली सुधागडसह रायगडातील बहुजन व स्थानिक युवकांना रोजगारात प्राधान्य द्या; यासह विविध लोकोपयोगी मागणीचे निवेदन ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष संदेश भालेराव यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी किशन जावळे व पोलीस अधीक्षक आंचलं दलाल यांना देण्यात आले.



ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाई केदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष संदेश भालेराव यांच्या सक्षम नेतृत्वात रायगड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली.

रायगडच्या जमिनीवर उभ्या राहिलेल्या उद्योगांमधून रायगडच्या युवकांनाही न्याय्य वाटा मिळावा, रोजगाराच्या संधींमध्ये स्थानिकांना सन्मानाचे स्थान मिळावे आणि औद्योगिक विकासासोबत सामाजिक विकासही साधला जावा, अशी ठाम भूमिका ऑल इंडिया पँथर सेनेने या निवेदनाद्वारे मांडली आहे. प्रशासन, उद्योग व्यवस्थापन आणि एमआयडीसी अधिकारी स्थानिक युवकांच्या रोजगाराच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घेतील, अशी अपेक्षा संघटनेचे जिल्हाध्यक्ष संदेश भालेराव व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. औद्योगिक विकासाच्या बाबतीत रायगड जिल्हा राज्यातील आघाडीच्या जिल्ह्यांपैकी एक मानला जातो. जिल्ह्यातील अनेक एमआयडीसी, मोठे औद्योगिक प्रकल्प, लॉजिस्टिक हब, वेअरहाऊस, पर्यटन केंद्रे आणि बांधकाम प्रकल्पांमुळे हजारो रोजगारनिर्मिती होत असली तरी स्थानिक युवकांना त्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर ऑल इंडिया पँथर सेनेने संविधानिक मार्गाने स्थानिक रोजगाराचा मुद्दा पुढे आणत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. रोजगाराच्या संधींसह कंत्राटी कामे, पुरवठा सेवा आणि विविध व्यावसायिक संधींमध्येही स्थानिकांना प्राधान्य देण्याची मागणी संघटनेने केली आहे. ऑल इंडिया पँथर सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश भालेराव यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात रायगड जिल्ह्यातील सुधागड, खालापूर, कर्जत, महाड, माणगाव, रोहा, पनवेल आणि इतर औद्योगिक भागांतील सामाजिक व आर्थिक वास्तव अधोरेखित करण्यात आले आहे.

## पान १ वरून

## नैसर्गिक पाण्याचा मार्ग अरुंद

त्यामुळे आंबेघर व पेझारी येथील शेतजमीन पाण्याखाली जाण्याचे संकट उभे राहिले आहे. पाणी जाण्याचा मार्ग अरुंद असल्याचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. त्याचा परिणाम भात पेरणी केलेल्या रोपांवर होत आहे. ही रोपे नष्ट झाली आहेत. या अरुंद पाण्याच्या मार्गामुळे शेतकऱ्यांच्या घरांमध्ये पाणी जाण्याचा धोका आहे. या पंपासाठी परवानगी देताना नैसर्गिक पाण्याचा मार्ग खुला करण्यात यावा अशी अट जिल्हाधिकारी यांनी घातली आहे. मात्र त्या अटीचे पालन न करता, बिनधास्तपणे बांधकाम करण्यात आले असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे या बांधकामावर स्थगिती आणून अतिक्रमण हटविण्यात यावे अशी मागणी निवेदनातून केली आहे.

## महाडमध्ये एनडीआरएफ तैनात; ३२ जवान दाखल

पोलादपूर तालुक्यातील पूरप्रवण तसेच दरडग्रस्त गावांना भेटी देणार असून नागरिकांमध्ये आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षिततेबाबत जनजागृतीही केली जाणार आहे. नदीकाठच्या आणि डोंगराळ भागातील नागरिकांनी घाबरून न जाता कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ एनडीआरएफ पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन एनडीआरएफचे इन्स्पेक्टर सुशांत शेट्टी यांनी केले आहे.

## आरडीसीसीची ८ हजार कोटींची विक्रमी झेप

मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी आपल्या मनोगतात बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाचे आभार व्यक्त करत ही कामगिरी एका दिवसात घडलेली नाही तर गेल्या अनेक वर्षांपासून राबविण्यात आलेले सुयोग्य नियोजन, आर्थिक शिस्त, नियामक सूचनांचे काटेकोर पालन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, आणि ग्राहकाभिमुख सेवा याबाबत मत व्यक्त केले. तसेच मार्च २०२८ पूर्वी बँकेचा व्यवसाय हा १०,००० कोटी तर स्वनिधी १००० कोटींपर्यंत पोहचेल, अशी खात्री त्यांनी अभिमानाने व्यक्त केली.

बँकेचा गौरवशाली वारसा, सातत्याने वाढणारी नफाक्षमता, आधुनिक बँकिंगचा स्वीकार आणि समाजहिताची भूमिका या बळावर रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकार क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळेच ८,००० कोटींचा व्यवसाय हा त्या प्रवासातील महत्त्वाचा मैलाचा दगड असून, हा टप्पा रायगडच्या विकासाला अधिक वेग देणाऱ्या आर्थिक शक्तीचा विस्तार ठरणार आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**३ जुलै**

१) श्रीम.नलिनी पांडुरंग लिमये अलिबाग, दि.३-७-१९४४

२)श्री.किशोर दत्तात्रेय खोत, दळीनगर, अलिबाग दि.३-७-१९५८

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक समता उन्मेश म्हात्रे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वरंडे ता. अलिबाग जि. रायगड | ५४३ | क्षेत्र ०.८१.०० पो.ख. ०.०१.०० एकूण क्षेत्र ०.८२.०० | ९.३५ |

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.२०.०० हे. आर, आकार २.३१ रू. पैसे

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.

दिनांक : ०२/०७/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

**ई-निविदा सूचना**

प्रधान मुख्य सिग्नल व दूरसंचार अभियंता पात्र बोलीदारांकडून ई-निविदा बोली आमंत्रित करित आहेत **ई-निविदा सूचना क्र.: केआर-सीओ-एसजी-ईटी-2026-01, दि.: 03.07.2026. कामाचे नाव :** कोंकण रेल्वे मार्गावरील कोलाड ते ठोकूर स्थानकादरम्यान कोंकण रेल्वेचे डार्क फायबर्स तीन वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देणे. **बोली सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ :** 27/07/2026 रोजी 16:00 वा. पर्यंत. **डार्क फायबरच्या एक जोडीसाठी किमान राखीव किंमत :** रु. 87,91,200/- (जीएसटी वगळून). अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्यावी.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| किसनलाल अमरसी राठोड | ५२ | २ | ०-६४-२० | ०-३० |
| सुरेश अमरसी राठोड | ५२ | ३ | ०-२४-०० | ०-१६ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आ खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०३/०७/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम. एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्हयू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-14/26-27 7000040582 | Supply of Rain suit of various sizes under EHV (O&M) Circle, Panvel For the block year 2026-2029 **Tender Fee Rs. 500/- + GST** | Rs. 6,47,560.68 |

EMD minimum Rs. 5000/- or 1% of estimated cost. **Submission of bids from 02.07.2026 to 16.07.2026 at 11:00 Hrs. Opening date :- 16.07.2026 @ 11:30 Hrs. for each tender.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm)
Mob. No. 8412050202. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

### हरकत नोटीसीचे उत्तर

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खानील वर्णन केलेली मिळकत आमच्या अशिनांच्या मालकीची म्हणजे १. गुलाब ब्रम्हानंद पाटील. २. रेश्मा ब्रम्हानंद पाटील. ३. भुषण ब्रम्हानंद पाटील. ४. अभिजित ब्रम्हानंद पाटील. ५. सुषमा ब्रम्हानंद पाटील. आमच्या अशिलांच्या मालकीची असून त्याचे कागदपत्रे व ७/१२ आमच्या अशिलांच्या नावे आहे.

| गावाचे नाव | भूमापन क्र. उपविभाग क्र. | क्षेत्र. हे. आर | आकार |
|---|---|---|---|
| मानकुळे ता. अलिबाग, जि. रायगड. | ९५/१/ब | १.०८.५० पोट. ख ०.०७.४० एकुण क्षेत्र १.१५.९० | १४.१३ |

सदर मिळकतीवर आपण दि.२०/०६/२०२६ रोजी हरकत कृषीवल पेपर मध्ये १. सुलोचना प्रभाकर पाटील २. प्रफुलता आनंद शिलकर ३. उषा शशिकांत म्हात्रे ४. रंजना नरेंद्र म्हात्रे ५. सुजाता संतोष पाटील ६. संकेत संतोष पाटील आपण आमच्या अशिलावर हरकत घेतली आहे. ७/१२ दप्तरी आमच्या अशिलांच्या नावे आहे. तरी सदर मिळकतीचे कागदोपत्री पुरावे खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आणून द्यावेत. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून आमचे अशीलांस सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देतील व मागावून येणाऱ्या कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही. अन्यथा आपण घेतलेल्या हरकतीस मान्यता रहाणार नाही.

हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. ०२-०७-२०२६.

सही/-
**ॲड. रेखा अनिल चिमणे**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मो. ९३७२३५२१३७

### अलिबाग नगरपरिषद
### जाहीर निविदा सुचना

अलिबाग नगरपरिषद शाळा क्र. ६ उर्दू माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना उर्दु माध्यमातुन शैक्षणिक सेवा पुरविणेकामी खालील प्रमाणे जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | इयत्ता | कोरी निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळणेची तारीख व वेळ | सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | नववी व दहावी | रु.५००/- | रु.५०००/- | दि. ०३/०७/२०२६ सकाळी ११.०० ते दि. ०९/०७/२०२६ (कार्यालयीन वेळेत) | ०९/०७/२०२६ रोजी सायं. ६.१५ वाजेपर्यंत. |

सुचना : १) निविदेबाबतची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळुन) महिला व बालकल्याण विभागात मिळेल.
२) निविदा द्विलिफाफा पद्धतीने सादर करण्याचे असुन लिफाफा नं. १ मध्ये पात्रते याबाबतची कागदपत्र व लिफाफा नं. २ मध्ये वित्तीय बोलिचा फॉर्म सादर करण्याचा आहे. दोन्ही लिफाफ्यावर कामाचे नांव व लिफाफा नंबर नमुद करावा.
३) अलिबाग नगरपरिषद कार्यालयात इसारा रक्मा पावती करुन रोखीने भरण्यांत यावी व पावती लिफाफयात निविदेसोबत सादर करावा.
४) निविदेबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये देण्यांत आलेल्या आहेत.

सही/-
**(सागर साळुंखे)**
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येते की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे नेहुली येथील, खालील वर्णनाची मिळकत गौरी विवेक बिर्जे यांचे खुद्द मालकीची आहे.

| गट/सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.-पै.) |
|---|---|---|---|
| २४ | ४ | ०-७२-१० | १४-२५ |

आमचे अशिलांनी सदर जमिन मिळकत खरेदी करण्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी चालू केली असून, सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी वर नमूद गट/सर्व्हे नंबर २४/४ या मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, मौजे नेहुली येथील गट/सर्व्हे नंबर २४/४ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकाव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण साटेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे इक्रसंबंध असल्यास व आमचे अशीलांनी ठरविलेल्या व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, डी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतींत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील, त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०२/०७/२०२६

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप, हौसिंग सोसायटी, मारुती नाका, अलिबाग - रायगड.
मोबाईल: ९२७०९६२९२९

### जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. मच्छिंद्र लक्ष्मण बोर्ले, रा. ठाणेन्हावे, पो. साजगाव, ता. खालापूर, जि. रायगड यांनी दिलेल्या माहीतीवरून खाली सही करणार यांचे मार्फत जाहीर नोटीसने तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या मालकीच्या मौजे ठाणे न्हावे, ता. खालापूर, जि. रायगड येथे मिळकत क्र. ७३ / ३, क्षेत्र ०.३४.०० हे. आर, आकार ४.३५रू. पै., भुमापन क्र. २७/५ क्षेत्र ०.७९.२० हे. आर, आकार १०.६० रू. पै. व भुमापन क्र. २३/४ क्षेत्र ०.३०.६० हे. आर, आकार १.०० रू.पै. अशा मिळकती आहेत. सदर जमिनींबाबत श्री. प्रफुल्ल विनायक देशमुख रा. ६९९/३ गुलमोहर, राम मंदीर-जवळ, पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दि. १९/०५/२०२५ रोजी आमचे अशिलांस फसवून चुकीचा व बेकायदेशीर मजकूर टाकून दस्त क्र. ३४७५ / २०२५ नुसार नोंदणीकृत केलेले कुलमुखत्यारपत्र आमचे अशिलांनी दि. ११/०६/२०२६ रोजी कायदेशीर नोटीस पाठवून तसेच दि. ११/०६/२०२६ रोजी दै. सागर या वृत्तपत्रात व दि. ११/०६/२०२६ रोजी दै. कृषिवल या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून रद्द केलेले आहे. सदर खोट्या व फसवून केलेल्या कुळअखत्यारपत्राचे आधारे मिळकत क्र. ७३/३ बाबत नोंदणीकृत झालेले हक्कसोडपत्र देखील फसवून केलेले असल्याने आमचे अशिलांवर ते बंधनकारक नसल्याची नोटीस संबधीताना पाठविण्यात आलेली आहे.

सदर सर्व मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा निम्मा अविभक्त हिस्सा असून तो आजही अबाधीत आहे. त्यावर अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध नाही. सदर मिळकतींमधील निम्म्या हिश्यावर आमचे अशिलांचीच मालकी असल्याने व आमचे अशिलांस सदर मिळकती सदयस्थितीत विक्री करण्याच्या नसल्याने सदर तीनही मिळकतींना आमचे अशिलीची जाहीर व सक्त हरकत असल्याने क्लिअर व मार्केटेबल टायटल नाही.

या अनुशंगाने सदर वर नमुद तीनही मिळकतींबाबत आमचे अशिलांचे काका मनोहर सिताराम बोर्ले व/वा श्री. प्रफुल्ल विनायक देशमुख यांच्याशी कोणताही प्रकारचा व्यवहार ठरवू नये. असा कोणताही व्यवहार हा बेकायदेशीर व्यवहार असून तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तसेच त्या व्यवहारानुसार वागणूक करण्याची जबाबदारी आमचे अशिलांवर असणार नाही. तसेच असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष व आमचे अशिलांचे संमतीविना झाल्यास त्यातील खरेदीदार हा आमचे अशिलांचे मालकीच्या व खुद्द ताबेकब्जा वहीवाटीच्या निम्म्या हिश्यापुरता प्रामाणिक खरेदीदार होणार नाही. तसेच त्याला तहयात कधीही सदर मिळकतीचा प्रत्यक्ष खुला व शांततामय ताबा मिळणार नाही. याची तमाम लोकांनी समज घ्यावी.

सदर जाहीर नोटीस ही आमचे अशिलांनी सांगितल्याप्रमाणे व दाखविलेल्या कागदपत्रांनुसार त्यांच्या सुचनेवरून देण्यात येत आहे.

हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. २/७/२०२६

सही/-
अशिलांची सही

सही/-
**(ॲड. तेजस्वी भिवा तळेकर)**
जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतीचे मालक मे. अशु फार्म इंटरप्रायजेस चे संचालक नंदकिशोर लक्ष्मीनारायण कागलीवाल यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| ५७ | ५अ | २.०४.०० पैकी ०.२८.०० | ०.६९ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०७/२०२६

**ॲड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### सार्वजनिक सूचना

**सर्वसामान्य जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, मे. एन.के. ॲग्रो फार्म, तिचे मालक श्री. केतन रसिकलाल शाह ("आमचे पक्षकार"), हे मे. समीरा लाइफस्टाइल्स प्रा. लि. आणि श्री. समीर अनिल नेस्रकर यांच्या वतीने क्वाड्रा लीगलने रायगड टाइम्स आणि कृषिवल या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केलेल्या दिनांक 26.06.2026 च्या निराधार आणि दिशाभूल करणाऱ्या सार्वजनिक सूचनेचे (सार्वजनिक सूचना) तीव्रपणे खंडन करत आहेत. कृपया नोंद घ्यावी की, आमचे पक्षकार हे खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मालमत्तेचे एकमेव, संपूर्ण आणि कायदेशीर मालक असून, ते त्या मालमत्तेच्या निरंतर आणि शांततापूर्ण ताब्यात आहेत.**

**आमचे पक्षकार उपरोक्त सार्वजनिक सूचनेतील प्रत्येक दाव्याचे संपूर्णपणे आणि स्पष्टपणे खंडन करतात, आणि असे नमूद करतात की विशेषत: 4 मार्च 2021 रोजीच्या समंजस्य करारा संबंधीचे (एमओयू) दावे खोटे आणि बनावट आहेत. कायद्यानुसार आणि न्यायानुसार, मालमत्तेची मालकी आमच्या पक्षकाराकडेच दृढपणे आणि पूर्णपणे निहीत आहे. उपरोक्त सार्वजनिक सूचना म्हणजे खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मालमत्तेमध्ये बेकायदेशीर हक्क, मालकी आणि/किंवा हितसंबंध निर्माण करण्याचा एकदुष्ट हेतूने केलेला प्रयत्न आहे. मे. समीरा लाइफस्टाइल्स प्रा. लि. आणि श्री. समीर अनिल नेस्रकर यांचा अनूसुचीतील मालमत्तेमध्ये कोणताही विद्यमान हक्क, मालकी किंवा हितसंबंध नाही, आणि सर्व सामान्य जनतेला त्यांच्या दिशाभूल करणाऱ्या दाव्यांवर विश्वास न ठेवण्याचा याद्वारे इशारा देण्यात येत आहे.**

**खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेसदर्भात त्यांच्याशी व्यवहार करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था, तो व्यवहार पूर्णपणे स्वत:चा जोखमीवर आणि खर्चावर करेल. आणि असे व्यवहार आमच्या पक्षकारावर कोणत्याही प्रकारे बंधकारक राहणार नाहीत. असा कोणताही अनधिकृत व्यवहार कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेच्या नावे कोणताही हक्क, मालकी आणि/किंवा हितसंबंध निर्माण करणार नाही. कृपया नोंद घ्यावी की, आमच्या पक्षकाराकडे खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मालमत्ता, मे. समीरा लाइफस्टाइल्स प्रा. लि. आणि श्री. समीर अनिल नेस्रकर यांच्यासह (परंतु इतकेच मर्यादित नसलेल्या) कोणत्याही तृतीय पक्षाच्या संमतीशिवाय विकण्याचा, हस्तांतरित करण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा अन्यथा व्यवहार करण्याचा अनिर्बंध कायदेशीर हक्क कायम आहे.**

**मालमत्तेचे परिशिष्ट**

**उपनिबंधक रायगड यांच्या अधिकार क्षेत्रात, धोकवडे गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, सर्व्हे क्रमांक 918 असलेली, एकूण क्षेत्रफळ 00.30.10 (हेक्टर. आर. चौ. मीटर), मूल्यांकन रु. 5 आणि 11 पैसे असलेली, जमिनीची ती संपूर्ण जागा, जिची चर्तु:सीमा खालील प्रमाणे आहे.**

**उत्तरकडे: सर्वेक्षण क्रमांक आणि उपविभाग 917**
**दक्षिणेकडे : आवास गावाची हद्द**
**पूर्वेला : सर्वेक्षण क्रमांक आणि उपविभाग 913 आणि 914**
**पश्चिमकडे : सर्वेक्षण क्रमांक आणि उपविभाग 919**

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : 03.07.2026**

ॲड. गौतम तिवारी
प्रोबस लीगल करीता
02222024359 / 9820010214
15, जॉली मेकर चेंबर 2, व्ही.के. शाह मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई, महाराष्ट्र-400021

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक १. प्रकाश बाबुलाल ओसवाल, २. सुरेश शेषमल ओसवाल, ३. चंदनमल प्रतापमल शहा, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीच्या, आणि भोगवटासदरी नावे असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकती**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १. | २/९ | ०.४१.०० | ०.४२ |
| २. | २/१०/ब | ०.४३.०० | ०.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

कर्जत दि. ०२/०७/२०२६

**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक श्री. हेमचंद्र जनार्दन उळे, रा. मु. १५७४, चिंतामणी गल्ली, नागाव बंदर, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष तावे कब्जातील बागायत मिळकत आमचे पक्षकार यांना कायम स्वरूपी विकत देण्याचे ठरविले असून तशी बयाणा पावती आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या बागायत मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव | २१५७ | ०-३७-२० पो.ख ०-०२-४० एकूण ०-७१-२० | २४.८३ |

या मिळकतीपैकी श्री. हेमचंद्र जनार्दन उळे, यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-३४-४० हे. आर, आकार १२.४२ रू. पैसे पैकी ०-१०-०० हे. आर ही बागायत मिळकत

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, पायवाट अथवा अन्य प्रकारचा कायदेशिर ढक्क हितसंबध असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशिर हक्क, हितसंबध नाहीत असे गृहित धरून त्या कायदेशिर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दि. /०७/२०२६

**ॲड. मयुरी अनिल वाकासकर**
नागाव, अलिबाग
मोबाईल नं. ८८८८२९९१६६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आम्ही खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदर जमीन ही सदर जमीनीचे विद्यमान मालक श्री. सतिश बळीराम पाटील रा कोतवाल नगर तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड ४१०२०१ यांचे प्रत्यक्ष ताये कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे दाखल आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मौजे माणकिवली तालुका कर्जत जिल्हा - रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र- हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २ | १/अ/२ | ०-४०-०० | ०-३७ |

या पैकी श्री. सतिश बळीराम पाटील यांचे मालकीचे क्षेत्र ०-२०-०० खरेदी देण्याचे ठरलेले आहे.

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, साठेकरार, ताबा, पयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाचे आंत खालील सडी करणार यांचे पत्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे डबक हितसंबंध नाहीत असे गृहित धरान आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करा मागाहून येणा-या तकारीस आम्ही जबाबदार राहणार नाही..

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक- ०२/०७/२०२६

सही/-
**श्री. कैलास नामदेव पाटील**
रा. तोंडरे, वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८
मोबाईल नंबर ९७०२५५५३९५/८२९१७५३६६८

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) अनिता अशोक सावंत, २) तेजश्री राजेश भावे, ३) गणेश दत्तात्रेय सावंत यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा / गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे

**मौजे तळवली ता. मुरूड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरूड | १६५ | ०-२४-०० पो.ख. ०-०७-१० एकुण क्षेत्र ०-३१-१० | २.५६/- |

दिनांक : ०३/०७/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८९६५**

# धरण भरले, पण तहान कायम

## ।। देहरंग धरण भरल्यामुळे दिलासा; तरीदेखील महिलांची मोठी कसरत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरासाठी महत्त्वाचा जलस्रोत असलेल्या अप्पासाहेब वेदक म्हणजेच देहरंग धरणाच्या सांडव्यावरून गुरुवारी (दि.२३) पहाटेपासून पाणी वाहू लागले आहे. गेल्या काही महिन्यांपासून धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठल्याने निर्माण झालेली पाणीटंचाईची चिंता यामुळे काही प्रमाणात कमी झाली आहे. मात्र, एका बाजूला धरण तुडुंब भरून वाहत असताना दुसऱ्या बाजूला शेजारील वाडीतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे वेदनादायी वास्तव समोर आले आहे.


● (छायाचित्र: राजेश डांगळे)

देहरंग धरणाची पाणीसाठा क्षमता ३.१२५ घनलक्ष मीटर आहे. पनवेल शहरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी या धरणाचा उपयोग केला जातो. मात्र, वाढत्या लोकसंख्येमुळे धरणातील पाणीसाठा अपुरा पडू लागल्याने पनवेल महापालिकेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून अतिरिक्त पाणी घ्यावे लागत आहे. या धरणातून दररोज सुमारे १६ दशलक्ष लिटर पाणी उपसा केला जात होता. मागील महिनाभर धरणातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने धरणक्षेत्र कोरडे पडले होते. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना महापालिकेला विशेष उपाययोजना कराव्या लागल्या होत्या. सध्या धरणात आलेल्या पाण्यामध्ये मातीच्या गाळाचे प्रमाण अधिक असल्याने सांडव्यावरील दरवाजे बंद करण्यात आलेले नाहीत. गाळयुक्त पाणी वाहून जाऊन स्वच्छ पाणी धरणात साठावे, असे महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. आणखी समाधानकारक पाऊस झाल्यानंतर धरणात पाणीसाठा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मे महिन्यात धरणातील अपुरा पाणीसाठा आणि एल निनोच्या प्रभावामुळे राज्य शासनाच्या सूचनेनुसार पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पनवेल महापालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन केले होते. आता धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागल्याने शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

एकीकडे जुलैच्या सुरुवातीपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल महानगरपालिकेच्या स्वमालकीच्या देहरंग धरणाने गुरूवारी ओव्हरफ्लो होण्यास सुरुवात केली असून पनवेलकरांच्या पाणीपुरवठ्याची चिंता मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. मात्र, याच धरणालगत असलेल्या कोंडाची वाडीतील आदिवासी नागरिकांना आजही पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. या वाडीतील पिण्याच्या पाण्याच्या मशिन्स दोन दिवसांपासून बिघाड अवस्थेत असून, पिण्याचे पाणी वाहून नेणारे जलवाहिन्यांदेखील गळती लागली आहेत. त्यामुळे येथील महिलांना डोंगर उतरत खाली असलेल्या विहिरीवर जावे लागत आहे. तेथून पाण्याने भरलेले दोन ते तीन हंडे डोक्यावर घेऊन आडव्या-उभ्या वळणाच्या चढणीच्या वाटेने घरी परतावे लागत आहे. त्यामुळे त्यांची मोठी कसरत होत आहे. मुसळधार पावसातही हा संघर्ष कायम असून, महिलांना जीव धोक्यात घालून पाणी आणावे लागत आहे. एका बाजूला धरण तुडुंब भरून वाहत असताना दुसऱ्या बाजूला शेजारील वाडीतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे वास्तव वेदनादायी आहे. संबंधित यंत्रणा तातडीने दुरुस्त करून कोंडाची वाडीतील नागरिकांना नियमित व सुरक्षित पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# थेरोंडा येथे अर्बन बँकेची नवी वास्तू

## सुप्रिया पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेडच्या थेरोंडा शाखेचे नवीन व प्रशस्त वास्तूमध्ये स्थलांतर करण्यात आले आहे. या नव्या शाखेचे उद्घाटन बँकेच्या चेअरमन सुप्रिया जयंत पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.





अलिबाग तालुक्यातील थेरोंडे फाटा येथील अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेडची नवीन शाखा अधिक प्रशस्त, सुसज्ज आणि ग्राहकांना आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणारी आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांसाठी ती मोठी सुविधा ठरणार आहे. ग्रामीण व उपनगरी भागातील नागरिकांना सुरक्षित, जलद आणि दर्जेदार बँकिंग सेवा देण्याच्या उद्देशाने बँकेने हे पाऊल उचलले असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. या नवीन शाखेच्या उद्घाटनप्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन सुभाष म्हात्रे, संचालक मंडळाचे सदस्य नितीन म्हात्रे, सुरेश खोत, निलेश खोत, खलिल तांडेल, माजी सरपंच मनिषा चुनेकर, हेमंत गणपत, शरद पाटील, संगीता पाटील, मधुकर फुंडे, सरोज वरसोलकर, संदीप खोत, अमित फुंडे, प्रमोद नवखारकर, डॉ. विजय वरसोलकर, शरद वरसोलकर यांच्यासह मोठ्या संख्येने खातेदार व नागरिक उपस्थित होते.

प्रारंभी नवीन वास्तूची विधिवत पूजा शरद पाटील आणि संगीता पाटील यांच्या हस्ते संपन्न झाली. धार्मिक विधीनंतर चेअरमन सुप्रिया जयंत पाटील व सुरेश खोत यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांनी फीत कापून शाखेचे उद्घाटन केले. यावेळी बोलताना सुप्रिया पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''ग्राहकांचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक बँकिंग सेवा ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असून, थेरोंडा शाखेच्या नव्या वास्तूमुळे ग्राहकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना देणे हेच आमचे ध्येय आहे.'' असे त्यांनी सांगितले.

## निवडक

### वाघोली-तिनवीरा रस्त्याची दुरवस्था

**वाघ्रण** : पावसाच्या पहिल्याच आठवड्यात अलिबाग तालुक्यातील वाघ्रण-वाघोली मार्गे तिनविरा रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. हा चार किलोमीटर लांबीचा रस्ता असून, जागोजागी खड्डे पडलेले आहेत. आता ते पाण्याने भरल्याने या मार्गावर प्रवास करणे कठीण झाले आहे. अरूंद रस्ता आणि खड्डे यामुळे अपघात होण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे. त्यामुळे प्रवासी वर्गातून लोकप्रतिनिधी व संबधीत विभागावर तिव्र नाराजी व्यक्त होत आहे. या आधी हा रस्ता अनेकदा शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून दुरुस्त करण्यात आला आहे. परंतु, यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी स्थानिक लोक प्रतिनिधी आणि संबंधित विभागाकडून दुर्लक्ष झाले आहे. या मार्गाकडे लक्ष न दिल्यास भविष्यात या मार्गावरील स्थानिकांना कार्लेखिंड किंवा जलपाडा मार्गे एमआयडीसी-पेझारी चेकपोस्ट असा प्रवास करावा लागेल. परंतु, हा प्रवास आणखी महागडा होईल. त्यामुळे संबंधित विभागाने कडे लक्ष देण्याची गरज असल्याचे स्थानिकांमधून आणि प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.



### गुरांचा गटारातील कचऱ्यावर ताव

**सुतारवाडी** : सुतारवाडी-कोलाड भागामध्ये गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावला आहे. परंतु, येथील रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणी खड्डे पडलेले आहेत अशा ठिकाणी पावसाचे तुडुंब पाणी साचले आहे. त्यामुळे या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना रस्ता शोधणे जिकरीचे झाले आहे. तसेच, भिरा फाट्यावर मेघना सिटी इमारती नजीक गटाराच्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचा ढीग साचला असून, भर पावसात गुर कचऱ्यावर ताव मारताना दिसत आहेत. गटाराच्या वाहत्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारचा कचरा टाकला जात असल्यामुळे तेथून पाणी पुढे जाणे अशक्य झाले आहे. हा कचरा पाण्यातच कुजून दुर्गंधी पसरण्याचे दाट शक्यता आहे. कोलाड पासून भिरा फाट्यापर्यंत जागोजागी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, या खड्ड्यांमध्ये पाणी तुडुंब भरत आहे. त्यामुळे वाहन चालकांना जीव धोक्यात घेऊन प्रवास करावा लागत आहे.

### माथेरानला पावसाची दमदार हजेरी

**माथेरान** : गेले दोन दिवस पावसाने संततधार सुरू ठेवली असून, माथेरानला चांगले झोडपले आहे. पाणीटंचाईने त्रासलेल्या माथेरानकरांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. पर्यटक देखील माथेरानमधील पावसाचा आनंद घेत आहेत. त्याचबरोबर धूक्याच्या चादरीमुळे येथील निसर्ग अधिकच खुलला आहे. तसेच, नेरळ-माथेरान घाटातील धबधबे ही प्रवाहित झाल्यानंतर उत्साहाचे वातावरण आहे. बुधवारी (दि.१) सकाळी आठ वाजेपर्यंत १७:४ मिमी इतकी पावसाची नोंद झाली. तर, सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ८४ मिमी पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर पावसाचा जोर वाढला असल्याने नागरिकांना पालिकेकडून सावधतेचा इशारा देण्यात आला होता. पावसामुळे अनेक ठिकाणी झाडाच्या फांद्या पडल्याच्या घटना घडल्या. त्यात मिलिंद कदम यांच्या घरावरही झाडाची मोठी फांदी पडल्याने घराचे मोठे नुकसान झाले आहे.


गुरूवारी (दि.२) समुद्राला मोठे उधाण आल्याने अलिबाग समुद्रकिनारी उंचच उंच लाटा उसळत होत्या. (छायाचित्रः समीर मालोदे)

# दिघोडे-चिर्ले मार्गाचे काम अपूर्ण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारित येणाऱ्या दिघोडे-चिर्ले मार्गाचे काम अद्यापही अपूर्णावस्थेतच आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात नागरिकांची डोकेदुखी वाढणार आहे. हा रहदारीचा मुख्य मार्ग पावसाच्या पाण्यात बुडून गेला आहे. या रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून सुरू असून, आता जुलै महिन्यातही पावसाला जोरदार सुरुवात झाली, तरी देखील या रस्त्याची कामे अपूर्ण आहेत.



या रस्त्यावर अनेक ठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. मात्र, काँक्रिटीकरणाचे काम अजून करण्यात आलेले नाही. आता तर या कोसळणाऱ्या पावसात या मार्गावर पाणी साचून चिखल झाला आहे. तसेच, या रस्त्यावर अपघाताची शक्यता वर्तवली जात आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला खोदण्यात आलेल्यागटारांचीकामेअपूर्णावस्थत आहेत. त्यामुळे रस्त्याच्या कडेला मातीचे ढीग दिसत आहेत. पावसाच्या पाण्यामुळे खड्डे अधिक खोल होऊन वाहतूक धोकादायक बनली आहे. दुचाकी स्वार, पादचारी, तसेच शालेय विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. अनेक ठिकाणी माती, खडी आणि बांधकाम साहित्य रस्त्यावर पडलेले दिसते. आजूबाजूच्या गोदामांमुळे सांडपाण्याचा योग्य रीतीने निचरा होत नसल्यामुळे या मुख्य मार्गाची पावसात दयनीय अवस्था झाली असून, चालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या रस्त्यावरील मोऱ्यांचे काम देखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपूर्ण असल्यामुळे पाणी जाण्याच्या मार्गात अडथळा निर्माण झाला आहे. या रस्त्याच्या कामात ठेकेदाराकडून डेब्रिज माती वापरल्यामुळे हा मार्ग चिखलमय झाला आहे. ठेकेदारांकडून या रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे, नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## मुसळधार पावसात पालिकेची धाव

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल शहरातील प्रभाग क्रमांक १९ मधील रोड परिसर जलमय झाल्याने नागरिकांची गैरसोय होत होती. या परिस्थितीची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे आणि स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर यांनी कर्मचारी व यंत्रणेसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी गटारे आणि पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याच्या मार्गातील अडथळे दूर करून पाण्याचा निचरा करण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले.

# रामवाडीत धोकादायक पाणी प्रवाह

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पेण तालुक्यातील रामवाडी येथील धोकादायक पाणी प्रवाहाबाबत दुर्घटना घडण्यापूर्वी तात्काळ उपयोजना करावी, अशी मागणी निवृत्त इंजिनिअर जीवन पाटील यांनी केली आहे. मुसळधार पावसामुळेवरूनमोठ्याप्रमाणातपाणी थेट राष्ट्रीय महामार्गावर कोसळल्याने या महामार्गाला धबधब्यांचे स्वरूप आले आहे. त्यामुळे दुचाकीस्वार, चारचाकी वाहने, शालेय बस तसेच इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेला गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जर दुर्घटना झाली तर याला जबाबदार कोण? असा सवाल ही जीवन पाटील यांनी केला आहे.



याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त अभियंता जीवन पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पचे वरिष्ठ अधिकारी निखिल कुमार यांच्याशी दूरध्वनीवर सविस्तर चर्चाकेली.तसेच,यासंपूर्णप्रकरणाची माहिती, छायाचित्रांसह आवश्यक तपशील नमूद करून त्यांना अधिकृत ई-मेलद्वारेही पाठविण्यात आला आहे. दि.३० जून रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावरील दोन्ही बाजूंनी पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी थेट राष्ट्रीय महामार्गावर कोसळल्याने दुचाकीस्वार, चारचाकी वाहने, शालेय बस तसेच इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला होता. या धोकादायक परिस्थितीची छायाचित्रे व माहिती प्रशासनालाही देण्यात आली. याबाबत प्रकल्पाचे वरिष्ठ अधिकारी निखिल कुमार यांनी संबंधित ठिकाणी कायमस्वरूपी पाणी निचऱ्याची व्यवस्था करण्यासाठीचा प्रस्ताव दिल्ली येथील सक्षम कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती दिली. तसेच हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासन सकारात्मक असून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

# उरणमधील अक्कादेवी धरण प्रवाहित

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जनतेला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई व पुनाडे धरण परिसरात पावसाची जोरदार सरी कोसळत असल्याने पाणीसाठ्यात वाढ होत आहे. ऐतिहासिक चिरनेर गावाजवळ तीन डोंगररांगांच्या कुशीत वसलेले अक्कादेवी धरण हे एक अतिशय निसर्गरम्य आणि सुरक्षित वर्षा सहलीचे ठिकाण आहे. पावसाळ्यात येथील फेसाळणारे धबधबे आणि हिरवागार परिसर पर्यटकांना आकर्षित करतो.



जून महिन्यापासून धरण क्षेत्रात पावसाचे प्रमाण कमी असल्याने पाणीसाठा चिंताजनक पातळीवर होता. मात्र, जुलै महिना उजाडताच २४ तासांत झालेल्या पावसामुळे तालुक्यातील रानसई व पुनाडे या दोन धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली असून, त्याचा सकारात्मक परिणाम एकूण साठ्यावर दिसून आला आहे. दरम्यान, सध्याचा पाणीसाठा अद्यापही समाधानकारक नसल्याने पुढील काही दिवस धरण क्षेत्रात चांगला पाऊस होणे आवश्यक आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, चिरनेर जंगल सत्याग्रहाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक प्रसिद्ध चिरनेर गावातील अक्कादेवी धरण हे प्रवाहीत झाल्याने तरुण वर्ग, निसर्ग प्रेमी विशेष करून पर्यटक सुखावला आहे.

# उरणमध्ये दुबार पेरणीचे संकट

**। उरण । प्रतिनिधी ।**

दोन दिवस झालेल्या दमदार पावसाने सगळ्यांना आनंद झाला असला तरीही पावसाची प्रतीक्षा करणारा अन्नदाता यामुळे संकटात सापडला आहे. पावसाचे पाणी भातशेतीत साचून राहिल्याने पेरणी केलेली भाताची रोपे पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे उरण तालुक्यातील सुमारे २३ ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.जूनच्या प्रारंभी एकदाच पडलेल्या मृग नक्षत्रातील पावसानंतर १९ दिवस तो पडलचा नाही. त्यामुळे खाडी किनाऱ्यालगतच्या भात शेतीत पेरणी केलेले भात बियाणाचे अंकुर फुटले नसल्याने बियाणाला बुरशीची लागण होऊन पेरणी केलेले संपूर्ण भात बियाणे वाया गेले. तर, काही ठिकाणच्या शेत जमिनीत भाताचे नर्सरी रोपे चांगली बहरली दिसत असताना, दोन दिवस पडणाऱ्या पावसाचे पाणी भात शेतजमिनीत साचून राहिल्याने भाताची रोपे पाण्याखाली गेली. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले.



## दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित | चौलमळा येथे भातलावणीला सुरुवात

# शिवार होणार हिरवेगार

**। चौल । प्रतिनिधी ।**

पहिल्या पावसाची चाहूल लागताच बळीराजा धूळवाफेची पेरणी करतो. मृगाच्या पावसाने त्या बियाण्यांना जीव येतो, रोपे जोमाने वाढतात आणि लावणीसाठी तयार होतात. त्यानंतर सुरू होते भात लावणीची लगबग. वर्षभराच्या आशा उराशी बाळगून शेतकरी पुन्हा काळ्या मातीत उतरतो. काही दिवसांत हेच शिवार हिरवेगार होणार, या विश्वासाने अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील शेतकरी जीवन लोहार यांच्या शेतातून भात लावणीला गुरुवार, दि. २ जुलैपासून सुरुवात झाली आहे.



अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथे सध्या भात लावणीची लगबग सुरू झाली आहे. शेतकरी जीवन लोहार यांच्या शेतात महिला, शेतमजूर आणि कुटुंबातील सदस्य चिखलात उतरून भातलावणीच्या कामात गुंतले असल्याचे चित्र दिसून येत आहे. पावसाच्या सरी, चिखलात सुरू असलेली धावपळ आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी आशा, यामुळे खरीप हंगामाची सुरुवात झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

अस्मानी संकटे ही शेतकऱ्याच्या आयुष्याचा जणू एक भागच बनली आहेत. कधी अतिवृष्टी, कधी पावसाचा खंड, तर कधी हवामान बदलाचा फटका... अशा संकटांना तो दरवर्षी सामोरा जात आहे. ''निसर्गाने झोडपलं, राजाने मारलं तर दाद कुणाकडे मागायची?'' अशी अवस्था अनेकदा निर्माण होते. तरीही शेतकरी खचत नाही. प्रत्येक संकटावर मात करत तो पुन्हा नव्या उमेदीने शेतात उतरतो. कारण त्याच्या कष्टावरच त्याचे घर, कुटुंब आणि वर्षभराची बेगमी अवलंबून असते.

> दरवर्षी काही ना काही संकट येतंच. तरीही शेती सोडून चालत नाही. पाऊस लांबल्यामुळे काहीशी चिंता होती. पण, पुन्हा एकदा पावसाने जोर धरल्याने लावणी सुरू केली आहे. आता पुढेही निसर्गाने साथ द्यावी आणि वर्षभराच्या कष्टाचं चांगलं फळ मिळावं, एवढीच अपेक्षा आहे.
> **– जीवन लोहार, शेतकरी**



## फोडाफोडीमागचा संदेश

ठाकरे गटातले अमुक तमुक फुटले ही आता नवीन बातमी राहिलेली नाही. आमदार किंवा खासदार फोडणे हा भाजप आणि शिंदे गटवाल्यांनी एक पोरखेळ बनवला आहे. या देशात मोदी आणि भाजप हेच सर्वशक्तिमान आहेत, सर्व पक्ष अंतिमतः त्यांच्यापुढे लीन होतात असा एक संदेश यातून दिला जात आहे. त्यातही महाराष्ट्रात आणखी एक पोट-राजकारण चालू आहे. भाजपवाले लोकांना थेट आपल्यात घेत नाही. शिंदे गट आणि अजित पवार गट यांचा वापर करून घेत आहेत. ही विरोधी पक्षवाल्या आमदार वगैरेंची ब्याद आपल्या पक्षात नको, पुढच्या वेळी त्यांना तिकिट द्या, निवडून आणण्याची जबाबदारी घ्या ही भानगड नको असा त्यामागचा विचार आहे. भाजपमध्ये बाहेरच्यांची गर्दी झाल्याने मूळ पक्षवाले फक्त सतरंज्या उचलायला आहेत काय अशी वाढती टीका होऊ लागली होती. त्यामुळेही हा मार्ग अवलंबला गेला असावा. ठाकरे गटाचे सहा खासदार फोडल्याचे रामायण चालू असतानाच आता शिंदे गटाने विधानपरिषदेत सचिन अहिर यांना फोडले आणि थेट उपसभापती करून टाकले. जे सचिन अहिर कालपर्यंत ठाकरे गटाच्या आणाभाका घेत होते ते आज शिंदे यांचे गुणगान गाऊ लागले आहेत. सचिन अहिर मूळचे राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या राजकारणातले. अरुण गवळीशी त्यांचे नातेसंबंध असल्याने मिल मजदूर संघात त्यांचा सहज शिरकाव झाला. तेव्हा मिल मजदूर संघ काँग्रेसच्या इंटक संघटनेकडे होता. तिथल्या गटतटांच्या राजकारणापायी गोविंदराव आदिकांनी सचिन अहिर यांना फूस दिली. पुढच्या टप्प्यात अहिर शरद पवारांसोबत गेले. नंतर वरळीच्या स्थानिक राजकारणामुळे शिवसेनेत गेले. पण आदित्य ठाकरे यांच्यामुळे त्यांचा तो मतदारसंघ गेला. तरीही ते शिंद्यांसोबत गेले नाहीत हे एक आश्चर्यच होते. पण आता त्यालाही पूर्णविराम मिळाला आहे. अहिर हे विधानपरिषदेत शिवसेनेच्या आमदारांच्या मतदानातून निवडून आले होते. त्यांनी पक्ष बदलला असता तर कदाचित पक्षांतरबंदी कायदा लागू झाला असता. पण त्यांना थेट उपसभापतिपदाची उमेदवारी देण्यात आली. उपसभापती हा कोण्या पक्षाचा नसतो अशी तोड त्यातून काढण्यात आली.

### निराशा पेरण्याचा कार्यक्रम

शिवाय, ही निवडणूक बिनविरोध करण्याची प्रथा आहे असा दाखला देऊन बुधवारी ठाकरे गटाच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला खाली बसवण्यातही यश आले. अर्थात, भाजप महायुतीची विधानपरिषदेतील ताकद पाहता ठाकरे गट किंवा महाविकास आघाडीचा विजय अशक्यच होता. ठाकरे गटाचे आणखीही आमदार वा खासदार आम्ही फोडू शकतो असे एकनाथ शिंदे यांनी वारंवार सांगितले आहे. वास्तविक महायुतीकडे गेल्या विधानसभेपासून राक्षसी बहुमत आहे. त्यांना विरोधी पक्षातील लोकांना फोडण्याची वा त्यांच्याकडून ताकद मिळवण्याची अजिबात गरज नाही. तरीही शिंदे असले उपद्व्याप करतात. यामागे मोठे कारस्थान आहे असेच म्हणावे लागेल. शिंदे यांना राज्याच्या राजकारणात आपली ताकद वाढवायची आहे. पण भाजपला पुढच्या निवडणुका स्वबळावर जिंकायच्या आहेत. अमित शाह यांनी तसे स्पष्ट सांगितले आहे. त्यामुळे शिंदे यांची ताकद फार वाढण्यामध्ये भाजपचा फायदा काही नाही. उलट असलाच तर तोटा आहे. अजितदादांचा पक्ष तर आता बाराच्या भावात गेल्यात जमा आहे. पण शिंदे आपले आमदार राखून आहेत. त्यांना बळकट होऊ दिले तर उद्या तेच भाजपला आडवे येऊ शकतात. नव्हे भाजपचे उद्याचे शत्रू तेच आहेत. अशा स्थितीत त्यांना फुकाचे बळ देण्यात भाजपला स्वारस्य असण्याचे कारण नाही. तरीही हे होते आहे याचे कारण म्हणजे हा लोकशाही आणि निवडणुका यांच्यावरचा लोकांचा विश्वास उडवण्याचा जंगी कार्यक्रम आहे. आज आपण समजा भाजपच्या विरोधातल्या उमेदवारांना निवडून दिले तरी उद्या ते फुटणारच आहेत, भाजपमध्येच सामील होणार आहेत असा एक व्यापक संदेश या प्रकरणातून दिला जात आहे. यामुळे मतदारांमध्ये निराशा व हताशा यावी हा उद्देश आहे. मतदारांनी एक तर मतदानाला येऊच नये किंवा आले तर भाजपला मतदान करण्यापलिकडे आपल्याला काही इलाज नाही असे त्यांना वाटावे असा हा कट आहे.

### दुष्टचक्र कसे भेदणार?

भाजपने गेल्या काही वर्षात निवडणूक आयोग, सीबीआय, पोलिस, न्यायालये वगैरे यंत्रणा खिळखिळ्या करून टाकल्या आहेत. यांना वाकवता येऊ शकते हे दाखवून दिले आहे. त्यापुढे सत्तेच्या स्वार्थापायी राजकारण करणाऱ्या आमदार खासदारांना फोडणे हे अगदीच किरकोळ आहे. पण हा केवळ ठाकरे गट किंवा तृणमूल काँग्रेस यांच्यापुरता प्रश्न नाही. भाजपच्या हिंदुत्वाच्या आणि हुकुमशाहीच्या राजकारणाला विरोध करण्यासाठी काँग्रेस किंवा डावे उभे आहेत. भाजपला त्यांचा धोका वाटतो. आज लाट आपल्या बाजूने आहे. पण उद्या जनतेचे मत फिरले तर एका सेकंदात काँग्रेस व डाव्यांनाच जनता उचलून धरायला कमी करणार नाही हे भाजपला ठाऊक आहे. त्यासाठी विरोधी मतांचे खच्चीकरण करणे भाजपला अत्यावश्यक वाटते. विरोधकांमध्ये सततच्या फोडाफोडी घडवून आणण्यामागे हेच कारण आहे. मुंबई महानगरपालिकेत तमाम शक्ती पणाला लावली, भाजपने सत्ता जिंकली. पण ठाकरे सेनेला संपवण्यात त्याला यश आले नाही. आता खासदार व आमदारांनंतर मुंबई किंवा अशाच उरल्यासुरल्या पालिकांमधील ठाकरे गटाचे बळ खलास करणे हा भाजपचा कार्यक्रम असेल. किंबहुना खासदार फुटले तेव्हाच मुंबई पालिकेतही वेगळा गट स्थापन होणार अशी चर्चा होतीच. ही स्थिती येण्याला विरोधी पक्षही तितकेच जबाबदार आहेत. त्यांना आपल्या नेत्यांमध्ये विचारसरणीच्या आधारे लढण्याची प्रबळ इच्छा तयार करता आलेली नाही. खासदार फुटल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राचा दौरा केला. पण सर्वत्र पुन्हा एकदा फुटीर बंडखोरांना गद्दार वगैरे शिव्या दिल्या. भाजपला विरोध करणाऱ्या तळाच्या कार्यकर्त्यांना पक्ष काय बळ देणार हे सांगितले नाही. वरवरच्या भाषणबाजीतून हे साध्य होत नाही. त्यासाठी रोजचा कार्यक्रम द्यावा लागतो. कार्यकर्त्यांच्या मागे उभे राहावे लागते. इतकी फुटाफूट होऊनही ठाकरे सेनेच्या मागे विदर्भ, मराठवाड्यातले लोक येतात यामागे बाळासाहेब ठाकरे यांच्यापासूनची पुण्याई आहे. तेव्हा काँग्रेसच्या प्रस्थापितांना विरोध करण्यासाठी गावोगाव जे कार्यकर्ते खडे राहिले त्यांना सेनेने ताकद दिली. अनेक फाटके लोक त्यातूनच आमदार व खासदार झाले. पण आज असे होण्याची शक्यता संपली आहे. एक तर ठाकरे यांचा करिश्मा कमी झाला आहे. दुसरे म्हणजे जनतेला ठोस कार्यक्रम व त्यांच्यासाठी लढणारे कार्यकर्ते हवे आहेत. भावनेवर आधारलेली भाषणबाजी ऐकून त्यांचे पोट भरत नाही. भाजपवाले हिंदुत्वाची भाषा करून लोकांना भुलवतात हे खरे आहे. पण ते एकमेव कारण नाही. सध्या, जनतेला द्यायचे पैसे, नोकऱ्या, सरकारी योजना भाजपच्या मुठीत असल्याने जनता नाइलाजाने त्याला शरण जात असते. सत्तेतून जनतेवर कबजा आणि त्या कबजातून पुन्हा सत्ता असे हे चक्र भाजपने निर्माण केले आहे.

**विचार**

# राजकीय संक्रमण साधणारे अधिवेशन

*संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये मांडले जाऊ शकणारे महिला आरक्षणाची अंमलबजावणी, परिसीमन आयोग, 'एक देश, एक निवडणूक' यांसारखे विषय केवळ कायदे नसून भारताच्या राजकीय व्यवस्थेच्या नव्या आराखड्याशी संबंधित आहेत. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे या अधिवेशनाकडे एका व्यापक राजकीय संक्रमणाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.*



**प्रा. अशोक ढगे**

गेल्या दशकात केंद्रातील सत्ताधारी पक्षाने केवळ निवडणुका जिंकण्यावर भर दिला नाही, तर शासनव्यवस्थेच्या रचनेत दीर्घकालीन बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. जीएसटी, कलम ३७० रद्द करणे, नागरिकत्व सुधारणा कायदा, नवीन फौजदारी कायदे, डिजिटल प्रशासन, थेट लाभ हस्तांतरण, सहकारी संघराज्याच्या नव्या व्याख्या अशा अनेक निर्णयांनंतर आता सरकारची नजर निवडणूक आणि प्रतिनिधित्वाच्या व्यवस्थेकडे वळली आहे. त्यामुळे पावसाळी अधिवेशन हे त्या प्रक्रियेतील पुढचे पाऊल ठरू शकते. राजकारणात बहुमत महत्त्वाचे असते; पण घटनात्मक बदलांसाठी केवळ बहुमत पुरेसे नसते. संविधानात बदल करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता ही भारतीय लोकशाहीने जाणीवपूर्वक ठेवलेली सुरक्षितता आहे. कारण संविधान हा केवळ सत्ताधाऱ्यांचा दस्तावेज नसून संपूर्ण राष्ट्राचा करार आहे. त्यामुळे कोणत्याही सरकारला आपल्या संख्याबळाचा वापर करून राज्यघटनेत सहज बदल करता येऊ नयेत, यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. याच ठिकाणी सध्याच्या राजकीय परिस्थितीचे महत्त्व वाढते. लोकसभेत सरकार मजबूत आहे. मित्रपक्षांचा पाठिंबा कायम आहे. शिवसेना आणि तृणमूल काँग्रेसमधील फुटीर खासदारांच्या भूमिकेमुळेही सरकारची ताकद वाढलेली दिसते. विरोधकांमधील विसंवाद आणि प्रादेशिक पक्षांच्या बदलत्या भूमिका सरकारसाठी अनुकूल वातावरण निर्माण करत आहेत; पण घटनादुरुस्तीच्या बाबतीत प्रत्येक मत महत्त्वाचे ठरते, म्हणूनच सरकारची राजकीय कौशल्याची खरी परीक्षा आता सुरू होणार आहे.

अलिकडेच पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनी विरोधी राजकारणातील विसंगती पुन्हा उघड केली आहे. निवडणुकीपूर्वी एकत्र दिसणारे पक्ष निकालानंतर पुन्हा आपल्या-आपल्या प्रादेशिक हितसंबंधांकडे वळले. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष आणि दक्षिणेतील प्रादेशिक पक्ष यांच्यातील राजकीय प्राधान्यक्रम वेगवेगळे आहेत. त्यामुळे संसदेत एकसंघ विरोध उभा करणे त्यांच्यासाठी अधिक कठीण झाले आहे. विरोधकांची सर्वात मोठी अडचण संख्येची नसून नेतृत्व आणि सामायिक अजेंड्याची आहे. या पार्श्वभूमीवर महिला आरक्षणाचा प्रश्न पुन्हा केंद्रस्थानी येणार आहे. महिला आरक्षणाला जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी तत्त्वतः समर्थन दिले आहे; मात्र त्याची अंमलबजावणी परिसीमनानंतर होणार असल्याने त्यामागील राजकीय गणित अधिक महत्त्वाचे ठरते. महिला प्रतिनिधित्व वाढवण्याच्या उद्देशाला कोणी विरोध करणार नाही; परंतु परिसीमनाच्या प्रक्रियेत कोणत्या राज्यांना किती जागा मिळणार, हा खरा राजकीय संघर्ष असेल. परिसीमन हा शब्द तांत्रिक वाटत असला, तरी त्याचे परिणाम दूरगामी आहेत. लोकसंख्येतील बदलानुसार मतदारसंघांची पुनर्रचना झाली, तर उत्तर भारतातील अनेक राज्यांना अधिक जागा मिळू शकतात, तर दक्षिणेतील राज्यांचा तुलनात्मक वाटा कमी राहण्याची शक्यता आहे. लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांना कमी प्रतिनिधित्व मिळणे हा अन्याय असल्याची भावना दक्षिणेकडील राज्यांमध्ये आधीपासूनच आहे. त्यामुळे परिसीमनाचा प्रश्न केवळ निवडणूक आयोगाचा विषय राहिला नसून संघराज्य व्यवस्थेच्या संतुलनाशी जोडला गेला आहे.

'एक देश, एक निवडणूक' हा याच साखळीतील पुढचा विषय आहे. निवडणुका वारंवार होत असल्याने विकासकामांवर परिणाम होतो, प्रशासन निवडणूक प्रक्रियेत अडकते आणि सार्वजनिक खर्च वाढतो, हा सरकारचा युक्तिवाद आहे. त्याउलट विरोधकांच्या मते, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सर्व निवडणुका एकाच वेळी घेणे व्यवहार्य नाही. राज्यांचे राजकीय प्रश्न आणि राष्ट्रीय मुद्दे वेगळे असतात. त्यामुळे एकाच वेळी मतदान झाल्यास प्रादेशिक प्रश्न दुय्यम ठरू शकतात. या दोन्ही बाजूंमध्ये तथ्य आहे. म्हणूनच या विषयावर व्यापक राष्ट्रीय चर्चा अपेक्षित आहे. संसदेत केवळ मतदान करून एवढ्या मोठ्या बदलाचा निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. राजकीय पक्ष, राज्य सरकारे, घटनातज्ज्ञ आणि निवडणूक आयोग या सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. सरकारसाठी आणखी एक अनुकूल बाब म्हणजे विरोधकांमधील फुटीचे राजकारण. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडली. काही ठिकाणी पक्षच दोन गटांमध्ये विभागले गेले. त्याचा थेट परिणाम संसदेतील संख्याबळावर झाला. अशा परिस्थितीत सरकारला स्वतंत्र खासदार किंवा छोट्या पक्षांचा पाठिंबा मिळवणे तुलनेने सोपे झाले आहे. हीच रणनीती आगामी अधिवेशनातही दिसू शकते; मात्र संख्याबळ वाढणे आणि राजकीय वैधता मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. घटनात्मक बदल जितके व्यापक सहमतीने होतील, तितकी त्यांची स्वीकारार्हता वाढेल. भारतासारख्या बहुपक्षीय लोकशाहीमध्ये संवाद संघर्षापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो. संसदेत विरोधक कमकुवत असले तरी त्यांचा आवाज महत्त्वाचा असतो.

या अधिवेशनात सरकारची आणखी एक परीक्षा असेल ती विधेयकांच्या गुणवत्तेची. अलीकडच्या काळात अनेक महत्त्वाची विधेयके अल्प चर्चेत मंजूर झाल्याची टीका झाली आहे. या पार्श्वभूमीवर या वेळी सरकारने व्यापक चर्चा घडवून आणली, संसदीय समित्यांकडे विधेयके पाठवली आणि विरोधकांच्या सूचनांचा विचार केला, तर त्याचा सकारात्मक संदेश जाईल. विरोधकांसाठीही हा आत्मपरीक्षणाचा काळ आहे. केवळ सरकारला विरोध करण्यापेक्षा पर्यायी धोरण मांडणे आवश्यक आहे. संसदेत जनतेच्या प्रश्नांवर प्रभावी चर्चा घडवून आणणे, विधेयकांमधील त्रुटी दाखवून देणे आणि विधायक सुधारणा सुचवणे, ही विरोधकांची खरी भूमिका आहे. ती त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्यास संख्याबळ कमी असूनही त्यांचा प्रभाव कायम राहू शकतो. एका अर्थाने हे अधिवेशन भारतातील नव्या राजकीय वास्तवाचे प्रतिबिंब असेल. मजबूत केंद्र सरकार, विखुरलेले विरोधक, घटनात्मक बदलांची तयारी आणि संघराज्य व्यवस्थेवरील नव्या चर्चा या सगळ्या घडामोडी एकाच वेळी घडत आहेत. त्यामुळे हे अधिवेशन केवळ चालू वर्षाचे संसदीय अधिवेशन राहणार नाही, तर पुढील दशकातील भारतीय राजकारणाचा आराखडा तयार करणारा टप्पा ठरू शकते. संसदेचे आगामी पावसाळी अधिवेशन हे केवळ नियमित अधिवेशन राहणार नाही, तर केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि विरोधी पक्षांच्या राजकीय ताकदीची मोठी परीक्षा ठरणार आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये देशाच्या राजकारणात घडलेल्या घटनांमुळे संसदेतील सत्तासमीकरणात लक्षणीय बदल झाला आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनंतर विरोधी आघाडीतील एकजूट आणखी कमकुवत झाली आहे. दुसरीकडे, शिवसेना आणि तृणमूल काँग्रेसमधील काही फुटीर खासदारांचा पाठिंबा मिळाल्याने सरकारचे संख्याबळ अधिक मजबूत झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार महिला आरक्षण, परिसीमन आणि 'एक देश, एक निवडणूक' यांसारख्या दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या विधेयकांच्या दिशेने पावले टाकण्याची शक्यता आहे. सरकारसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे घटनादुरुस्तीची आवश्यकता असलेली विधेयके. साध्या कायद्यांप्रमाणे ही विधेयके केवळ साध्या बहुमताने मंजूर होत नाहीत. त्यासाठी उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश बहुमत, तसेच सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या निम्म्याहून अधिक सदस्यांचा पाठिंबा आवश्यक असतो. त्यामुळे लोकसभेत मजबूत बहुमत असूनही राज्यसभेतील संख्याबळ आणि प्रादेशिक पक्षांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय जनता पक्षाने निवडणुकांमधील विजयासोबतच संसदेतील आपली राजकीय पकड सातत्याने मजबूत केली आहे. मित्रपक्षांशी संबंध दृढ ठेवणे, नव्या सहयोगींना जोडणे आणि विरोधी पक्षांमधील असंतुष्ट नेत्यांना आपल्याकडे वळवण्याची रणनीती यशस्वी ठरली आहे. त्यामुळे 'एनडीए'ची राजकीय ताकद वाढली असून सरकारचा आत्मविश्वासही उंचावला आहे.

पावसाळी अधिवेशनात याच बळाची प्रचिती देण्याचा प्रयत्न सरकार करेल, असे वाटते. शेवटी, कोणतेही सरकार कायम सत्तेत राहणार नसते आणि कोणताही विरोधक कायम कमकुवत राहत नाही; पण संसद कायम असते. तिची प्रतिष्ठा, तिची चर्चा आणि निर्णय यांवरच लोकशाहीचा दर्जा ठरतो. पावसाळी अधिवेशनात सरकारने संख्याबळाचा संयमाने वापर केला आणि विरोधकांनी विरोधाला विधायक स्वरूप दिले, तर भारतीय लोकशाही अधिक सक्षम होईल. अन्यथा, हे अधिवेशनही केवळ आकड्यांच्या विजयाचे आणि संवादाच्या पराभवाचे प्रतीक ठरेल.

**चर्चा आजची**

# पालकांचा मुलांशी संवाद काळाची गरज

**सुयोग आंग्रे**

नसरापूर बालिका हत्याकांडाचानिकाल न्यायालयाने दिला आणि जुन्या आठवणी ताज्या झाल्या. देशाच्या इतिहासात नोंद होणारा हा क्षण होता. बालिकेवर अत्याचार करणाऱ्या त्या नराधमाला न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आणि सावित्रीच्या लेकींना न्यायालयात न्याय मिळाला अशी चर्चा सर्वत्र रंगली. हि एक घटना आहे. अशा अनेक घटना देशात घडल्या आहेत. अनेक घटनांचेखटलेन्यायालयात सुरु आहेत. यामुळे या खटल्याचा निकाल पाहता सबळ पुराव्यांच्या आधारावर झालेली शिक्षा अन्य खटल्यांना मार्गदर्शक ठरणारीअसणार यामध्ये मुळीच शंका नाही. महिलांवर होणारे अत्याचार खासकरून यामध्ये लहान मुलींना टार्गेट करण्याकडे नराधमांचा कल असल्याचे पाहावयास मिळते. अशा प्रकारांमध्येनराधम अटक होतात. त्यांना शिक्षा होते. परंतु बालिका व महिलांवर होणारे अत्याचार अद्याप थांबलेले नाहीत. न्यायालयात गेलेलाखटला कायद्याच्या चाकोरीत राहून सोडवला जातो. तो सोडविलाजाईल परंतु आजच्या समाजाला मानसिकता बदलण्याच्यागरज निर्माण झाली आहे. आपला देश पुरुष प्रधान संस्कृती गाजवणारा असलातरी आजवरच्या इतिहास पहिला तर महिलांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे हे भारतीय इतिहासामध्ये अधोरेखित केल्याचे आपल्याला पाहावयासमिळते. रूढी , परंपरा यांच्या जोखडातून मुक्त होत देश वैज्ञानिक युगात महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. हे आपण पाहत असताना महिलांवर होणारे अत्याचार कायमचे संपण्याऐवजी त्यामध्ये अधिक वाढ होताना दिसत आहे. यासाठी महिलांसाठीच्या कायदे अधिक कठोर करायला हवेत आणि बालिकांबरोबर पालकांचा संवाद वाढविण्यावर भर द्यायला हवा. देशात महिला अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये अधोरेखित करण्यासारख्या घटनांमध्ये शालेय मुलींवर होणारे अत्याचार सामाजिक वैष्यम्यता वाढविणारे ठरत आहेत. सामाजिक विचारांची बैठक आणि विचारांचे अधिष्ठान लोप पवण्याचे हे संकेत आहेत. यासाठी समाजाने पुढाकार घेताना पालकांनी स्वतः पाल्याच्या सुरक्षेसाठीची पावले उचलायला हवीत. बालिकांवर अत्याचाराच्या घटना अनेकदा हळूहळू प्रक्रियेचा परिणाम असतात ज्यामध्ये प्रथम विश्वास संपादन केला जातो, नंतर भावनिक जवळीक विकसित केली जाते आणि शेवटी केवळ विचार आणि निर्णयांवरच नव्हे तर व्यक्तीच्या शरीरावर आणि स्वातंत्र्यावरही नियंत्रण स्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. पौगंडावस्था हा जीवनाचा टप्पा असतो जेव्हा एखादी व्यक्ती त्याच्या ओळखीच्या शोधात असते. मानसशास्त्रज्ञ एरिक एरिक्सन याला 'आयडेंटिटी विरुद्ध रोल कन्फ्युजन'चा टप्पा म्हणतात. या टप्प्यात, किशोरवयीन मुले ते कोण आहेत आणि इतरांच्या नजरेत त्यांची ओळख काय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करतात. स्वीकृती, मैत्री, आपलेपणा आणि भावनिक जोडणीची गरज या वयात साहजिकच जास्त असते. म्हणूनच जर एखाद्याने पद्धतशीरपणे किशोरवयीन मुलीचा विश्वास कमावला आणि तिला विशेष वाटले तर त्याचा परिणाम अपेक्षेपेक्षा खूप जास्त असू शकतो. अनेक वेळा, किशोरवयीन मुलीला हे समजू शकत नाही की तिला प्रेम आणि आपुलकी काय वाटते हे प्रत्यक्षात एक सुनियोजित सापळा आहे, ज्यामध्ये भावनिक जवळीक नियंत्रण आणि शोषणाचे साधन म्हणून वापरली जाते. ॲन बॉलबीच्या 'अटॅचमेंट थिअरी'नुसार, प्रत्येक व्यक्तीला भावनिक सुरक्षितता आणि कनेक्शन आवश्यक आहे. जेव्हा ही गरज कुटुंब, मित्र समूह किंवा सामाजिक वातावरणात पुरेशी पूर्ण होत नाही, तेव्हा ती व्यक्ती इतर स्त्रोतांमध्ये शोधू लागते. जर प्रत्येक किशोरवयीन मुलास भावनिक सुरक्षितता आणि कनेक्शनची आवश्यकता असेल, तर ती प्रथम कोठे भेटली पाहिजे हा प्रश्न आहे. सामान्यतः उत्तर कौटुंबिक आहे. कुटुंब ही केवळ आर्थिक किंवा भौतिक गरजा पूर्ण करणारी संस्था नाही, तर ती भावनिक सुरक्षितता, संवाद, विश्वास आणि जवळीक यांचेही प्रमुख स्त्रोत आहे. जेव्हा कौटुंबिक आणि पौगंडावस्थेतील संवाद कमकुवत होऊ लागतो, जेव्हा किशोरवयीन मुले त्यांच्या भावना, भीती आणि अनुभव उघडपणे सांगू शकत नाहीत तेव्हा भावनिक अंतर निर्माण होऊ लागते. अशा परिस्थितीत, पौगंडावस्थेतील मुले सहसा त्यांच्या कुटुंबाबाहेरील नातेसंबंध शोधू लागतात जिथे त्यांना ऐकले जाते, समजले जाते आणि त्यांचे मूल्य होते. म्हणूनच पौगंडावस्थेतील कुटुंबाची भूमिका केवळ संरक्षणापुरती मर्यादित नसते, तर ती भावनिक संतुलन आणि आत्म विश्वासाचा आधार बनते. प्रेम आणि कनेक्शनची गरज ही मानवी गरजांपैकी एक आहे. पौगंडावस्थेमध्ये, जेव्हा एखादी व्यक्ती आपली ओळख आणि सामाजिक मान्यता शोधत असते, तेव्हा त्याच्यासाठी आपलेपणा आणि महत्त्वाची भावना अत्यंत महत्त्वाची बनते. समाज कितीही बदलला आणि आई-वडील त्यांच्या कामात कितीही व्यस्त असले तरी मुलांप्रती त्यांची जबाबदारी सर्वांत जास्त असते. आज संयुक्त कुटुंबांच्या जागी लहान कुटुंबे, वाढती स्पर्धा आणि संवादाच्या कमी होणाऱ्या संधींमुळे अनेक किशोरवयीन मुलांमध्ये भावनिक एकटेपणाची भावना वाढली आहे. मुलांना केवळ संसाधनांचीच गरज नाही तर वेळ, संवाद, विश्वास आणि उपस्थिती देखील आवश्यक आहे. जेव्हा कुटुंबे त्यांच्या मुलांच्या भावनिक जगाशी जोडलेली राहतात, तेव्हा अनेक संभाव्य धोके ओळखले जाऊ शकतात आणि सुरुवातीच्या टप्प्यातच टाळता येतात. ज्या समाजात कौटुंबिक, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये तुलनेने मजबूत असतात, अशा घटनांची शक्यता तुलनेने कमी असते.

याशिवाय दक्ष देखरेख यंत्रणाही आवश्यक आहे. याचा अर्थ तथाकथित 'हेलिकॉप्टर पालकत्व' किंवा मुलांच्या गोपनीयतेवर सतत आक्रमण असा नाही. याचा अर्थ एवढाच की कुटुंब, शाळा आणि समाज यांनी किशोरवयीन मुलांच्या जीवनात होत असलेल्या महत्त्वाच्या बदलांबाबत संवेदनशील आणि सतर्क असले पाहिजे. वर्तन, मित्र मंडळ, दैनंदिन दिनचर्या, भावनिक स्थिती किंवा डिजिटल क्रियाकलापांमध्ये काही असामान्य बदल दिसल्यास ते वेळीच समजून घेऊन त्यावर संवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. किशोरवयीन मुलांची सुरक्षा ही एका व्यक्तीची, एका संस्थेची किंवा फक्त कुटुंबाची जबाबदारी नाही, ती संपूर्ण समाजाची सामायिक जबाबदारी आहे.

**लोकसंसद**

## आणखी किती 'झाड बळी?'

मुंबईच्या चेंबूर येथे एका स्कूलबसवर महाकाय पिंपळाचे झाड कोसळून झालेल्या अपघातात एका ११ वर्षीय निष्पाप शाळकरी मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर मुंबईत पावसाळ्यात झाडे कोसळून जीवितहानी होण्याचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वास्तविक गेल्या काही वर्षापासून मुंबईत पावसाळ्यात झाडे कोसळून त्याखाली नागरिकांचे जीव जाणे ही सामान्य गोष्ट झाली आहे. कारण मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत आकडेवारीनुसार मुंबईत २०१२ ते जून २०२६ या चौदा वर्षांच्या कालावधीत झाडे अंगावर कोसळून ५४ निष्पाप नागरिकांचा नाहक बळी गेला आहे आणि ४२५ हून अधिक जण जखमी झाले आहेत. अशा परिस्थितीत रस्त्यावरून चालणाऱ्या सामान्य नागरिकाच्या डोक्यावर झाड कोसळून कधी मृत्यू ओढवेल याचा काही नेम राहिलेला नाही. वर्षानुवर्षे या ना त्या कारणाने विविध शासकीय यंत्रणा मुंबईतील रस्ते खोदून ठेवतात. अशावेळी कंत्राटदाराकडून रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांची काळजी घेतली जात नाही. त्यावेळी प्रशासनाच्या झालेल्या दुर्लक्षामुळे 'मुळे' कमकुवत झालेली झाडे मुसळधार पावसात कोलमडून पडतात. त्यामुळे मुसळधार पावसात आधी वृक्षवल्लींचे मरण होते आणि त्यांच्या कोसळण्यामुळे नागरिकांचे नाहक जीव जातात. खरे तर झाडे ही आपली जीवन आधार प्रणाली आहे, पण प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हीच झाडे आज मुंबईकरांसाठी जीवघेणी ठरत आहेत. प्रशासनाने आणखी 'झाड बळी' जाण्याची वाट न पाहता या समस्येवर कायमस्वरूपी आणि कठोर पावले उचलावीत हीच सर्वसामान्य मुंबईकरांची अपेक्षा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

**दिनविशेष**

# आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन

आज आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन. जगभरात ३ जुलै रोजी हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने लोकांना प्लास्टिकपासून होणाऱ्या गंभीर आरोग्यविषयक आणि पर्यावरणीय परिणामांबद्दल जागरूक केले जाते. सहज दिसणारी प्लास्टिकची पिशवी किंवा बाटली आपल्या शरीरात शिरून कर्करोग, प्रजनन क्षमता कमी होणे, फुफ्फुसांचे नुकसान, आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे यांसारख्या आजारांना आमंत्रण देते, हे बहुतांश लोकांना माहीतच नसते.

दरवर्षी, जगभरात अब्जावधी प्लास्टिक पिशव्या घेतल्या जातात आणि टाकून दिल्या जातात. ज्यामुळे पर्यावरणाची लक्षणीय हानी होते. प्लॅस्टिक प्रदूषणामुळे आपल्या परिसंस्था, वन्यजीव आणि मानवी आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या समस्येकडे लक्ष देण्याची निकड ओळखून आंतरराष्ट्रीय समुदायाने आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिनाची स्थापना केली. ३ जुलै रोजी साजरा होणारा हा वार्षिक कार्यक्रम प्लास्टिक पिशवीचा वापर कमी करण्याच्या गरजेची जागतिक आठवण म्हणून काम करतो आणि व्यक्ती, व्यवसाय आणि सरकारांना अधिक टिकाऊ भविष्यासाठी कृती करण्यास प्रोत्साहित करतो. आपल्या आजूबाजूचा बहुतांश अन्न, पाणी, व खाद्यपदार्थ प्लास्टिकमध्ये साठवला जातो. गरम पदार्थ प्लास्टिकच्या डब्यात ठेवले जातात, पाणी प्लास्टिकच्या बाटल्यांतून प्यायले जाते. या प्रक्रियेतून बीपीए, फॅथलेट्स आणि इतर अनेक विषारी रसायने अन्नात मिसळतात. हेच अन्न किंवा पाणी आपण रोज सेवन करतो आणि अशा प्रकारे हे विष आपल्याच शरीरात प्रवेश करते. दररोज हजारो टन प्लास्टिक कचरा नद्या, तलावांमध्ये टाकला जातो. एकदाच वापरायच्या वस्तू प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, कंटेनर हे सर्व वर्षानुवर्षे विघटित होत नाहीत. हेच प्लास्टिक माश्यांच्या पोटात जातं, जलचर मरतात. शेवटी, हे प्लास्टिक पुन्हा आपल्या पाण्यात मिसळतं आणि आपल्या शरीरात पोहोचतं. प्लास्टिक पिशव्या आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. ते हलके, सोयीस्कर आणि सहज उपलब्ध आहेत. तथापि, त्यांच्या डिस्पोजेबल स्वभावामुळे त्यांना पर्यावरणाची मोठी चिंता वाटते. प्लॅस्टिक पिशव्या नॉन-बायोडिग्रेडेबल असतात आणि शेकडो वर्षे पर्यावरणात टिकून राहू शकतात. जेव्हा अयोग्यरित्या विल्हेवाट लावली जाते, तेव्हा ते बहुतेकदा लँडफिल्स, जलकुंभांमध्ये संपतात किंवा वाऱ्याद्वारे वाहून जातात, शेवटी आपल्या ग्रहाला प्रदूषित करणाऱ्या प्लास्टिकच्या कचऱ्याच्या मोठ्या प्रमाणात योगदान देतात. हा दिवस प्लास्टिक पिशव्यांसाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करतो. कापूस किंवा ताग यांसारख्या नैसर्गिक तंतूंनी बनवलेल्या पुन्हा वापरता येण्याजोग्या पिशव्या उत्कृष्ट पर्याय आहेत. या पिशव्या टिकाऊ, बायोडिग्रेडेबल आहेत आणि वारंवार वापरल्या जाऊ शकतात, ज्यामुळे एकेरी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांची गरज लक्षणीयरीत्या कमी होते. शिवाय, कागदी पिशव्या किंवा वनस्पती-आधारित सामग्रीपासून बनवलेल्या कंपोस्टेबल पिशव्या वापरण्यास प्रोत्साहन देणे देखील एक टिकाऊ निवड असू शकते.

प्लास्टिक पिशव्यांचे पर्यावरणावर होणारे परिणाम अनेक पटींनी होतात. अंतर्ग्रहण आणि अडकल्यामुळे सागरी जीवांना प्रचंड त्रास होतो. समुद्री कासव, डॉल्फिन, समुद्री पक्षी आणि इतर सागरी प्राणी अन्न म्हणून प्लास्टिकच्या पिशव्या चुकीच्या पद्धतीने वापरतात, ज्यामुळे घातक परिणाम होतात. याव्यतिरिक्त, प्लास्टिकच्या पिशव्या आपल्या महासागरांमध्ये मोठ्या कचऱ्याच्या पॅचच्या निर्मितीमध्ये योगदान देतात, ज्यामुळे सागरी परिसंस्थेवर नकारात्मक परिणाम होतो आणि नैसर्गिक संतुलन बिघडते. सागरी पर्यावरणाच्या पलीकडे प्लास्टिकच्या पिशव्या पार्थिव परिसंस्थेलाही हानी पोहोचवतात. ते ड्रेनेज सिस्टीम बंद करतात, ज्यामुळे पूर आणि जल प्रदूषण वाढते. प्लॅस्टिकच्या कचऱ्यामुळे विषारी रसायने जमिनीत जातात, ज्यामुळे झाडांच्या वाढीवर आणि जमिनीच्या सुपीकतेवर नकारात्मक परिणाम होतो. नैसर्गिक लँडस्केपमध्ये प्लॅस्टिक पिशव्यांमुळे होणारा दृश्य बिघडल्याने आपल्या सभोवतालचे सौंदर्य कमी होते आणि पर्यटनाची क्षमता कमी होते.

**उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग यांजकडून**

**अधिसूचना**

**सांबरकुंड मध्यम प्रकल्प, ता. अलिबाग, जि. रायगड प्रकल्पासाठी भूसंपादन, पुनर्वसन व पुनः स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम ११ (१) खालील**

क्रमांक उविअ/भूसंपादन/पुनर्वसन/सांबरकुंड/२०२६.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/ प्र.क्र.७७/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना ") याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "सार्वजनिक प्रयोजनासाठी" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींमध्ये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.

आणि त्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अ नुसार कोणतीही व्यक्ती, हि अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, सक्षम प्राधिकारास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईलः

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धी पुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची सक्षम प्राधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार सक्षम प्राधिकारी भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, रायगड यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांस पदनिर्देशित केले आहे.

**अनुसूची—एक**

**जमिनीचे वर्णन**

मौजे महान, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड

भूसंपादन प्रकरण क्र.५७०,संपादित निवाडा, दिनांक १७ सप्टेंबर २०११

| अ.क्र. (१) | भूमापन / गट क्रमांक (२) | संपादित क्षेत्र (हे.आर.चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | २३ | १.३१.६० |
| २ | २५ | ०.०९.६० |
| ३ | २६ | २.९०.४० |
| ४ | २७/२ | १.२३.२० |
| ५ | २९ | ०.३९.२० |
| ६ | ३० | १.४९.४० |
| ७ | ३८ | ०.८२.२० |
| ८ | ३९ | ०.१८.०० |
| ९ | ४० | ०.१९.७० |
| १० | ४१ | ०.१९.६० |
| ११ | ४३ | ०.२३.३० |
| १२ | ४४ | ०.२०.७० |
| १३ | ४५ | ०.०६.८० |
| १४ | ४६ | ०.०५.२० |
| १५ | ४७ | ०.२७.१० |
| १६ | ४८ | १.९०.५० |
| १७ | ४९ | १.२४.७० |
| १८ | ५० | ०.५६.०० |
| १९ | ५१ | १.५१.८० |
| २० | ५५ | ०.९४.०० |
| २१ | ५६ | १.९८.८० |
| २२ | ५८ | ०.६२.०० |
| २३ | ५९ | ०.७२.०० |
| २४ | ६३ | ०.७१.९० |
| २५ | ६४ | ०.३४.७० |
| २६ | ६५ | ०.३२.०० |
| २७ | ६७ | ०.३८.५० |
| २८ | ६८ | ०.४५.०० |
| २९ | ७० | ०.०८.१० |
| ३० | ७२ | १.७८.७० |
| ३१ | ७३ | ०.४४.१० |
| ३२ | ७४ | ०.२७.०० |
| ३३ | ७५ | ०.३८.४० |
| ३४ | ७६ | ०.७०.६० |
| ३५ | ७७ | ०.४९.०० |
| ३६ | ७८ | ०.१७.०० |
| ३७ | ७९ | ०.६५.०० |
| ३८ | ८० | ०६४.०० |
| ३९ | ८१ | ०.५२.२० |
| ४० | ८२ | ०.३८.८० |
| ४१ | ८३ | ०.१०.०० |
| ४२ | ८४ | ०.३८.०० |
| ४३ | ८५ | २.२९.७० |
| ४४ | ८६ | ०.१६.९० |
| ४५ | ८७ | ४.३९.२० |
| ४६ | ८८ | ०.७४.०० |
| ४७ | ८९ | ०.७९.०० |
| ४८ | ९० | ०.६८.७० |
| ४९ | ९३ | ०.१७.४० |
| ५० | ९६ | १.८८.२० |
| ५१ | ९९ | २.८२.४० |
| ५२ | १०० | ०.१०.०० |
| ५३ | १०१ | १.५०.६० |
| ५४ | १०६ | ०.५६.८० |
| ५५ | १०७ | ०.५६.३० |
| ५६ | १०९ | ०.१८.०० |
| ५७ | १११ | ३.०६.८० |
| ५८ | ११२ | ०.१६.५० |
| ५९ | ११३ | ०.१७.१० |
| ६० | ११४ | ०.३१.६० |
| ६१ | ११५ | ०.८६.०० |
| ६२ | ११६ | ०.१२.३० |
| ६३ | ११७ | ०.४५.१० |
| ६४ | ११८ | ०.०४.३० |
| ६५ | ११९ | ०.७४.४० |
| ६६ | १२० | ०.२५.५० |
| ६७ | १२१ | ०.८२.०० |
| ६८ | १२२ | ०.२१.१० |
| ६९ | १२३ | १.८८.०० |
| ७० | १२४ | ०.३४.०० |
| ७१ | १२६ | ०.२४.३० |
| ७२ | १२७ | १.१८.३० |
| ७३ | १२८ | ०.८३.२० |
| ७४ | १२९ | ०.८३.२० |
| ७५ | १३० | ०.८३.५० |
| ७६ | १३१ | १.०५.०० |
| ७७ | १३२ | ०.१५.०० |
| ७८ | १३३ | ०.४१.०० |
| ७९ | १३४ | ०.८६.०० |
| ८० | १३६ | १.६१.९० |
| ८१ | १३७ | ०.७०.६० |
| ८२ | १३८ | ०८७.०० |
| ८३ | १३९ | ०.११.०० |
| ८४ | १४० | ०.३२.८० |
| ८५ | १४१ | ०.३९.५० |
| ८६ | १४२ | ०.६६.०० |
| ८७ | १४३ | ०.२१.५० |
| ८८ | १४४ | ०.०६.१० |
| ८९ | १४५ | ०.२७.३० |
| ९० | १४६ | ०.२७.३० |
| ९१ | १४७ | ०.४९.३० |
| ९२ | १४८ | ०.४२.३० |
| ९३ | १४९ | ०.३८.०० |
| ९४ | १५० | ०.५६.६० |
| ९५ | १५१ | १.७८.०० |
| ९६ | १५२ | १.१६.१० |
| ९७ | १५३ | ५.२१.४० |
| ९८ | १५४ | ०.७५.९० |
| ९९ | १५५ | ०.३३.०० |
| १०० | १५७ | ०.४०.४० |
| १०१ | १५८ | ०.१८.०० |
| १०२ | १५९ | १.०४.२० |
| १०३ | १६० | ०.८७.०० |
| १०४ | १६२/१ | ०.२०.०० |
| १०५ | १६२/२ | २.६७.०० |
| १०६ | १६२/३ | ०.४०.०० |
| १०७ | १६३ | ०.८८.०० |
| १०८ | १६४ | ०.८९.०० |
| १०९ | १६५ | ०.८९.०० |
| ११० | १६६ | १.७३.०० |
| १११ | १७१ | ०.४६.३० |
| ११२ | १७२ | १.०३.६० |
| ११३ | १७३ | ०.२४.३० |
| ११४ | १७४ | ०.२५.३० |
| ११५ | १७६ | १.२५.४० |

(पान ६ वर)

(पान ५ वरुन)

| अ.क्र. (१) | भूमापन / गट क्रमांक (२) | संपादित क्षेत्र (हे.आर.चौ.मी) (३) |
|---|---|---|
| ११६ | १८१ | ०.३५.४० |
| ११७ | १८२ | ०.५५.६० |
| ११८ | १८३ | १.४९.३० |
| ११९ | १८४ | ०.५२.०० |
| १२० | १८७/१ | २.०१.४० |
| १२१ | १८७/२ | ०.७५.०० |
| १२२ | १८८ | ०.७९.०० |
| १२३ | १८९ | ०.१६.५० |
| १२४ | १९० | ०.४३.६० |
| १२५ | १९१ | ०.६५.६० |
| १२६ | १९२ | ०.६१.७० |
| १२७ | १९३ | ०.८३.३० |
| १२८ | १९४ | ०.३६.०० |
| १२९ | १९५ | १.३५.८० |
| १३० | १९६ | १.७६.५० |
| १३१ | २७४ | ०.०२.२० |
| एकूण क्षेत्र | | १०३.८१.२० |

**मौजे महान, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**

**भूसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नव्याने प्रस्तावित**

| अ.क्र (१) | भूमापन/गट क्रमांक (२) | संपादित क्षेत्र (हे.आर.चै.मी) (३) |
|---|---|---|
| १ | १६ | २.८६.७० |
| २ | २४ | ०.३३.१० |
| ३ | २७/१ | ०.०४.०० |
| ४ | २८ | २.२६.५० |
| ५ | ३१ | ०.०३.०० |
| ६ | ३२ | ०.१६.०० |
| ७ | ३३ | ०.१२.६० |
| ८ | ३४ | २.९९.९० |
| ९ | ३५ | ०.७०.५० |
| १० | ३६ | ४.५५.०० |
| ११ | ५२/१ | १.००.०० |
| १२ | ५२/२ | १.०४.०० |
| १३ | ५३ | ४.८१.७० |
| १४ | ६० | ०.५१.०० |
| १५ | ६१ | ०.५९.२० |
| १६ | ६२ | ०.३०.०० |
| १७ | ६६ | ०.३८.७० |
| १८ | ७१ | ०.२७.०० |
| १९ | ९१ | १२.३८.०० |
| २० | ९२ | ०.७१.३० |
| २१ | ९४ | २.०२.०० |
| २२ | ९८ | १.१८.०० |
| २३ | १०३ | ०.३७.०० |
| २४ | १०५ | ०.५३.०० |
| २५ | १०८ | १.८२.०० |
| २६ | ११०/१ | ९.२१.०० |
| २७ | ११०/२ | ०.५०.०० |
| २८ | १६१ | ४.७५.८० |
| २९ | १६७ | ०.२७.०० |
| ३० | १६८ | १.०६.०० |
| ३१ | १६९/१ | ०.३८.०० |
| ३२ | १६९/२ | ०.३८.०० |
| ३३ | १६९/३ | ०.३८.०० |
| ३४ | १६९/४ | ०.३८.०० |
| ३५ | १६९/५ | ०.३८.०० |
| ३६ | १६९/६ | ०.३७.५० |
| ३७ | १७० | ०.७५.२० |
| ३८ | १७५/१ | १.२०.३० |
| ३९ | १७५/२ | १.३४.०० |
| ४० | १७७/१ | ५.६९.८० |
| ४१ | १७७/२ | ४.००.०० |
| ४२ | १७८ | १.१६.०० |
| ४३ | १८० | २.२४.२० |
| ४४ | १८५ | ०.१६.२० |
| ४५ | १८६/१ | ०.४९.०० |
| ४६ | १८६/२ | ०.७९.०० |
| ४७ | १९७ | ०.६७.६० |
| ४८ | १४ | ०.११.३५ |
| ४९ | १५ | ०.०१.४० |
| ५० | ३७ | ०.००.०६ |
| ५१ | ४२ | ०.३६.०० |
| ५२ | १५६ | ०.००.५० |
| ५३ | १७९ | ००.०२.०० |
| ५४ | १८५ | ०.१६.२० |
| ५५ | १९८ | ०.१३.०५ |
| ५६ | १९९ | ०.३२.९० |
| ५७ | २०० | ०.२४.५० |
| ५८ | २०१ | ०.१३.१० |
| ५९ | २०२ | ०.१७.७० |
| ६० | २०३ | ०.४१.५५ |
| एकूण क्षेत्र | | ८०.६९.११ |

**मौजे रामराज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**
**(पर्यायी रस्त्याकरिता भूसंपादन प्रकरण प्रस्तावित)**

| अ.क्र (१) | भूमापन/गट क्रमांक (२) | संपादित क्षेत्र (हे.आर. चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | १०६ | ०.३६.०० |
| २ | ११० | ०.३९.०० |
| ३ | ११२ | १.१४.०० |
| ४ | ११५ | ०.०६.५० |
| एकूण क्षेत्र | | १.९५.५० |

**मौजे राजेवाडी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**
**(भूसंपादन प्रकरण प्रस्तावित)**

| अ.क्र (१) | भूमापन/गट क्रमांक (२) | संपादित क्षेत्र (हे.आर. चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | ८ | ०.२५.०० |
| २ | २३ | ०.१९.०० |
| ३ | २७ | ०.०६.०० |
| ४ | २८ | ०.३२.०० |
| एकूण क्षेत्र | | ०.८२.०० |

**मौजे रामराज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**
**(प्रकल्पाच्या पुनर्वसनाकरिता भूसंपादन झालेले क्षेत्र)**

| अ.क्र १ | भूमापन/गट क्रमांक २ | संपादित क्षेत्र (हे.आर. चौ.मी) ३ |
|---|---|---|
| १ | ११२ | १६.०६.५० |
| एकूण क्षेत्र | | १६.०६.५० |

**अनुसूची – दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण.**

**प्रकल्पाचे नाव –** सांबरकुंड मध्यम प्रकल्प, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
**प्रकल्पाचे कार्य वर्णन–** धरण बांधकाम सिंचन प्रकल्प
**समाजाला मिळणारे लाभ–** पायाभूत सुविधा

(शेतीसाठी, घरगुती पिण्यासाठी, औद्योगिक कारणासाठी पाणीपुरवठा, कुटीर उद्योग, लघुउद्योग, मत्स्यव्यवसाय, पर्यटन व इतर लाभांबाबत)

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तिचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** — धरणाच्या बुडीत क्षेत्राकरिता

**अनुसूची- चार**
**सामाजिक परिणाम निर्धारणांचा सारांश**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील अधिसूचना, क्रमांक एसआयए-२०२५/प्र.क्र.३१८/भूसंपादन-२, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ असाधारण क्र. ४४८ प्रमाणे (सामाजिक परिणाम निर्धारण).

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) महाराष्ट्र राज्याला लागू असताना, (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम १० क मध्ये, अशी तरतूद आहे की, राज्य शासनास लोकहितास्तव **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे उक्त कलम १० क मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकल्पांना, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येईल;

ज्याअर्थी, राज्य शासनाला असे दिसून आले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची-१ मध्ये नमूद केलेल्या जमिनी या अनुसूची-२ मध्ये नमूद केलेल्या प्रकल्पासाठी आवश्यक आहेत किंवा आवश्यक असण्याची शक्यता आहे, उक्त कलम १० क (यापुढे " उक्त प्रकल्प " म्हणून संदर्भित) च्या खंड (ख) म्हणजेच सिंचन आणि विद्युतीकरणासह ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्प अंतर्गत समाविष्ट आहे :

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने उक्त प्रकल्पांकरिता केवळ किमान निव्वळ जमिनीची आवश्यकता भासेल हे लक्षात घेऊन प्रस्तावित संपादनासाठीच उक्त जमिनीचे व्याप्तिक्षेत्र निश्चित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम १० क खालील उक्त प्रकल्पाला उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सूट देणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम १० क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे लोकहितास्तव, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देत आहे. असे अधिसूचित केले आहे.

**अनुसूची- पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम | उपविभागीय अधिकारी, अलिबाग. |
| ब. | प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | तहसील कार्यालय अलिबागच्या मागे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन. नं. ४०२ २०१. |
| क. | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आले आहे. त्या अधिसूचनेचे विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापूर्वी भरावे | मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील दिनांक १५ ऑगस्ट २०१३ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती. |

**टीप.**— सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कलम ११ (१) उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, अलिबाग यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल. तसेच उक्त जमिनीच्या आराखड्याचे निरीक्षण करता येईल.

**मुकेश चव्हाण,**
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी अलिबाग,
उपविभाग अलिबाग.

**किशन जावळे,**
जिल्हाधिकारी, रायगड.

अलिबाग,
दिनांक २७ एप्रिल २०२६.

क्र. जिमाका/रायगड/जाहीरात/५७/८१६/२०२६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक विनोद गोपिनाथ ठाकूर आणि सुगंधा विनोद ठाकूर यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्र. ५५ अ, प्लॉट क्र. २ वरील स्वामी सानिध्य गृहनिर्माण संस्था मर्यादीत मधील स्वामी दर्शन (बी टाईप) या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०१ क्षेत्र ३५.५९ चौ.मी. (कारपेट) जिचा ग्रामपंचायत चेंढरे घर मिळकत क्र. १९२०/१ आहे.**

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०३/०७/२०२६

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
अन्नपूर्णा, मु. पो. धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड)**

ज.म.रअर्ज-०८/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति
श्री.अनिल एकनाथ पाटील
मेचको, आंबेली-डावाले मार्ग — अर्जदार
ता.अलिबाग जि.रायगड

विरूद्ध

ग्रुप ग्रामपंचायत नागाव,
ता.अलिबाग, जि.रायगड — सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१.अर्जदार श्री.अनिल एकनाथ पाटील हे मेचको, आंबेली-डावाले मार्ग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे आई. कै.विजया एकनाथ पाटील यांना मृत्यू दि.१८/१०/२०२३ रोजी मेचको, आंबेली-डावाले मार्ग येथील राहत्या घरी झाला होता.

मात्र त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत नागाव येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यू दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत नागाव यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणीचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२३/०७/२०२६ रोजी पर्यंत मे.तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२५/०६/२०२६ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारीख : ०३/०७/२०२६

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## -: मागणी नोटीस :-

जा.क्र./७९कलम १५६/
स्थावर मालमत्ता जप्ती/२०२६-२७
विशेष वसुली अधिकारी, अलिबाग यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या
अलिबाग, मुख्य कार्यालय
दिनांक : ०२/०७/२०२६

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि नियम १९६१ चा नियम क्र.१०७ (३) अन्वये

प्रति,
१) श्री पांडुरंग धोंडू दिवकर (मयत)
वारस-श्रीमती अनिता पांडुरंग दिवकर मु.पो.रामराज
ता.अलिबाग, जिल्हा रायगड
२) श्री सुरेश खेळया दरोडा
मु. खैरवाडी महान, पो. रामराज ता. अलिबाग, जिल्हा रायगड
३) श्री. अमोल लक्ष्मण बडे मु. भाल, पो. थळ
ता. अलिबाग, जि. रायगड

१) ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ मधील तरतूदीनुसार तुमचे विरुद्ध मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था- अलिबाग रायगड यांचेकडून ''वसुली दाखला'' क्रं. ५९/ कलम १०१/२०२४-२५/ दिनांक २८/०२/२०२५ रोजी मिळविलेला आहे व तो बजावण्यासाठी खाली सही करणार यांचेकडे आलेला आहे,

२) आणि ज्याअर्थी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक जाक्र. जिउनि/कात-६/कलम १५६/आदेश/ रायगड जि.म.स. बँक/९८२/ सन २०२६/दिनांक ४ मे २०२६ रोजी निम्न स्वाक्षरीदार यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चे अधिकार प्रदान करणेत आले आहेत.

३) आणी ज्याअर्थी वर नमुद वसुली दाखल्यामध्ये अर्जाची रक्कम रुपये ४,६९,३१८/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख एकोणसत्तर हजार तीनशे अठरा मात्र) अधिक अर्जाची फी व खर्च रक्कम रुपये ७६००/-(अक्षरी रक्कम रुपये सात हजार सहाशे मात्र) असे एकुण रक्कम रुपये ४,७७,९१८/- येणे बाकी आहे व या दाखल्यानुसार दिनांक ०१/०४/२०२४ पासून रक्कम परत फेड करेपर्यंत येणेबाकी रक्कम रु ४,७७,९१८/- वर दरसाल दरशेकडा १०.५०% टक्के दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम देणेचे आदेश आहेत,

४) आणी ज्याअर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग शाखा रेवदंडा यांचेकडील माहितीनुसार व खाते उताऱ्यानुसार वसुली प्रमाणपत्र निर्गमीत झालेनंतर जमा केलेली रक्कम रु २२,३३९/- अशी आहे व ती वजा जाता आपणाकडून रक्कम मुद्दल रु ४,५५,५७९/- व व्याज रु १,०८,३५३/- असे एकूण रुपये ५,६३,९३२/- (अक्षरी रुपये पाच लाख त्रेसष्ट हजार नऊशे बत्तीस मात्र) येणे आहे,

५) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम क्रं. १०७ (३) अन्वये तुम्हास नोटीस देण्यात येते की :-

- या नोटीशीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत वर क्रमांक ३ मध्ये नमूद केलेली रक्कम व्याजासह परत करावी.
- येणेप्रमाणे वरील मुदतीत तुम्ही संपूर्ण रक्कम व्याजासह परत न केल्यास तुमची जंगम व स्थावर मालमत्ता जप्त केली जाईल.
- जप्त केलेल्या जंगम व स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात येईल व त्यातून बँकेस येणे असलेल्या रकमेची वसुली करण्यात येईल.
- तुमचेकडून रक्कम वसूल करण्याकरीता होणाऱ्या खर्चास तुमची जबाबदारी राहील व सदर खर्चाची रक्कमही तुमचेकडून वसूल करण्यात येईल.

कळावे.
ठिकाण : अलिबाग

**(श्री के के राऊत)**
**विशेष वसुली अधिकारी**
**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - आंबिवली त. कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रू.-पै |
|---|---|---|---|---|
| भूषण विश्वनाथ रसाळ | ३७ | ७/ब | ०-३२-०० | ०-२६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. अशोक मारुती कोकणे**
दिनांक : ०३/०७/२०२६
मो.नं. ७०५८७७८६५३

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम )**

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (बांधकाम), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे खुली निविदा एक पाकीट बोली प्रणाली अंतर्गत निविदा मागविण्यात येत आहेत. **कामाचे नाव**: महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील इंदापूर, गोरेगांव रोड आणि उक्षी स्थानकांवर मॉड्युलर शेल्टरचे बांधकाम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-सीओपी-12-2026, दिनांक: 03.07.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु.12,79,219.94 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 10.07.2026. **समाप्ती दिनांक/वेळ**: ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्यासाठी 24.07.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **काम पूर्ण करण्याचा कालावधी**: 3 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. सविस्तर माहिती/सहभागासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** संकेतस्थळाला भेट द्या तसेच शुद्धिपत्र/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. मुकुलराज भटनागर यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे-मार्गाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| ३३ | १/ब/२ | ०.३५.०० पो.ख. ०.०५.०० | २.०५ |
| ३२ | २ | ०.३७.१० पो. ख ०.०३.५० | २.८० |
| ३२ | १/ब/२ | ०.३५.०० पो.ख.०.०५.०० | २.०४ |
| ३२ | १/अ/२ | ०.४२.०० पो.ख.०.०३.०० | १.३५ |
| ३१ | ३/ड | ०.४२.०० पो.ख. ०.००.०० | ०.२० |
| ३१ | ३/ब | ०.४२.०० पो.ख.०.००.०० | ०.३० |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण कर्जत,
दिनांक : ०२/०७/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे.**
पत्ता: दहिवली, ए. व्हि. एफ . रेसिडेन्सी,
ललानी रोड कर्जत, ता. कर्जत, रायगड.
मो.नं. ९२६०१०९२८२.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री तिमीर दगडु कडु २) सौ. वैशाली शेखर खरिवले ३) श्री. सुनिल दगडु कडु यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६० | १/अ/१ | ०-४१-०० | ४=९६ |
| ६० | २ | ०-१४-७० | ०=१२ |
| ६१ | ३ | ०-१८-७० | ०=१६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०७/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

## जाहीर नोटीस

दिनांक : ०३ जुलै २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु. -पै. |
|---|---|---|---|---|
| आत्माराम शंकर वाव्हळ | ७१ | १ | ०-४१-२० | ५-५७ |
| | यापैकी लिहून देणार यांच्या सामाईक मालकीच्या हिश्याची विक्री केलेले क्षेत्र ०-२०-०० मात्र. | | | |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. भालिवडी,
पो. गौळवाडी, ता. कर्जत,
जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. नयन सुभाष भोईर**
दिनांक : ०३/०७/२०२६
मो.नं. ९७६५३७५६६९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. महेश मनोहर म्हात्रे व श्री. उन्मेश मनोहर म्हात्रे दोघे रा. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| चेंढरे ता.अलिबाग. | ३६/१/२/२६ | २-७७-०० | २७.७० |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून ०७ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०७/२०२६

सही /-
**ॲड. विवेक रमेश साळवी**
अशिलाची सही.
शॉप नं.५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर
ता.अलिबाग, जि.रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकानी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-वडवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमिन मिळकतः-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मंगला धोंडीराम देसाई | ४० | ३ | ०-०६-०० | ० | ०३ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता-ए विंग, फ्लॅट नं.४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी
ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

सही/-
**ॲड.निलेश दामु मुंढे**
दिनांक ०३/०७/२०२६
मो.नं.८४४६८६९६७१
ई मेल:nileshmundhe029@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल श्री. रूपेश बाळकृष्ण कोलबालकर यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत व त्यामधील घर जमीन मिळकतीचे मालक श्री. किशोर विठ्ठल शिंदे, राहणार मौजे चंदन हिल्स, फ्लॅट नं. १०२, काटरंग रोड, खोपोली पावर हाऊस, महालक्ष्मी मंदिर समोर, खोपोली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, पिन कोड ४१०२०३ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्रफळ हे. आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे निगडोली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड | १२०/५/ड | एकूण क्षेत्र १.७८.३० यापैकी विक्री करणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.१८.५० | ०.५३ |

**सदर मिळकतीच्या चर्तुसीमा येणेप्रमाणे**
**पुर्वेस : श्री. अशोक रामचंद्र शिंदे यांची स.नं. १२०/५/ड मधील मिळकत**
**पश्चिमेस : स. नं. ४/६ ही मिळकत**
**दक्षिणेस : स.नं. ५/१३ ही मिळकत**
**उत्तरेस : रस्ता**

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत व त्यामध्ये असणाऱ्या घराबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता.०३.०७.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव,
ता. कर्जत जि. रायगड.
मो. नं. ९३०७८८५७११

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी दिलेल्या माहिती वरुन व सांगितले वरुन त्यांचेतर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते पुढील प्रमाणे. माझे अशिल यांनी खाली नमुद केलेल्या मिळकती संदर्भात १) श्री. महेश गजानन चव्हाण मु. बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०३ २) सौ. सविता गजानन चव्हाण मु. बेलोशी, ता.अलिबाग,जि.रायगड ४०२२०३ ३) सौ. सुजाता सुरेश भोस्तेकर मु. चौल, बागमळा, ता.अलिबाग, जि. रायगड ४०२२०३ ४) सौ. स्नेहा संतोष पालवे मु. वाणी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२११० यांचे मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

**मौजे बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाचे मिळकत.**

| गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.चौरस मिटर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|
| १३१ | ०-३४-६० | ८.५२ |

सदरहू मिळकत व त्यात असलेले वहिवाटीचे हक्क, वहिवारंग, वगैर सह अशी मालमत्ता सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. महेश गजानन चव्हाण मु. बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०३ २) सौ. सविता गजानन चव्हाण, मु. बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०३ ३) सौ. सुजाता सुरेश भोस्तेकर मु. चौल, बागमळा, ता.अलिबाग, जि. रायगड ४०२२०३ ४) सौ. स्नेहा संतोष पालवे मु. वाणी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२११० यांचे मालकी हक्काची असल्याचा भरवसा १) श्री. महेश गजानन चव्हाण २) सौ. सविता गजानन चव्हाण ३) सौ. सुजाता सुरेश भोस्तेकर ४) सौ. स्नेहा संतोष पालवे यांनी दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचा गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत खाली सही करणार यांजकडे सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल व मालकी हक्काची खात्री करुन त्या अनुषंगाने दाखला देण्यात येईल. मागाहून कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०१.०७.२०२६

**(ॲड. पराग मधुकर गुरव)**
मु.मधुमालती,रामनाथ,
ता.अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८४४६८८०००९

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे गाण तर्फे श्रीगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत.

| मौजे | भुमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| गाण तर्फे श्रीगांव | २७/१ | ०.०६.६० | १.६९ |
| गाण तर्फे श्रीगांव | ३७ | ०.१२.९० | ३.०० |
| गाण तर्फे श्रीगांव | ३९/१ | ०.४६.२० | ५.५० |
| गाण तर्फे श्रीगांव | ३९/४ | ०.२२.८० | ३.८१ |

वर नमुद मिळकतीत ग्रुप ग्रामपंचायत खिडकी मालमत्ता क्र. ५३ व ६३ या वर्णनाच्या घर मिळकती असून येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत, त्यात असलेला झाड झाडोरा वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती दिव्या आजित सुंदरेश, श्री. महेश विनायक रकवी व श्री.संदेश विनायक रकवी, श्रीमती अरूणा अनिल शेलाणकर, श्रीमती अलका दिपक भट्टे, सर्व मु. मुंबई यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्रीमती दिव्या आजित सुंदरेश, वगैरे यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सबब, याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०२.०७.२०२६

सही/-
**(ॲड. एस. वाय. बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले, ता. माणगांव, जि. रायगड. अल्प मुदतीची जाहीर निविदा सूचना

ग्रा.पं.नोटीस बोर्ड प्रसिद्धी

ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले,यांचेकडील ग्रा. पं. फंड अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम | इसारा फी | निविदा फी | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिला बचत गटांना सतरंजी पुरविणे | ४०९३२ | ४०९ | २००/- | ०६/०७/२०२६ | ०७/०७/२०२६ |
| २ | मागासवर्गीय वस्तीकरिता खुर्च्या पुरविणे | ४५००० | ४५० | २००/- | ०६/०७/२०२६ | ०७/०७/२०२६ |
| ३ | मुलांना पोष्टीक आहार पुरविणे | ५५२७५ | ५५२ | २००/- | ०६/०७/२०२६ | ०७/०७/२०२६ |
| ४ | महिलांना सॅनेटरी पॅड खरेदी करणे | ३४११० | ३४१ | २००/- | ०६/०७/२०२६ | ०७/०७/२०२६ |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. ६/७/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/ पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत दहिवली/गोवेले**
**ता.माणगांव जि. रायगड**

सही/
**सरपंच**
**ग्रामपंचायत दहिवली/गोवेले**
**ता. माणगांव जि. रायगड**

## निविदा सूचना

ग्रामपंचायत नांदवी ता.माणगाव, जि.रायगड यांचेकडून खालील नमूद कामाकारीता नांदवी ग्रा.प.हद्दीत बांधकाम ठेकेदाराकडून शासनाच्या अटी व शर्तीस आधीन राहून सिलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा ग्रामपंचायत नांदवी कार्यालयाकडे दि: १५/०७/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्वीकारण्यात येतील.

| कामाचे नाव व ठिकाण | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम अंतिम तारीख | निविदा सादर करणेची वेळ: वेळ | निविदा सादर करणेची वेळ: ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नांदवी मुस्लिम कब्रस्थान वाल कम्पाउंड बांधणे | १५ व वित्त आयोग | १००००००/- | ३ महिने | २००/- | १०/०७/२०२६ | सायंकाळी ०६:०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |

अटी व शर्ती

१)सहभागी ठेकेदाराने निविदा सीलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक.
२) कोऱ्या निविदा निविदा प्रसिद्धीच्या दिनांका पासून निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेतच उपलब्ध होतील. निविदा फॉर्म निविदा फी निविदा फॉर्म घेताना कार्यालयात रोख स्वरूपात जमा करून त्याची पावती घेणे आवश्यक राहील, अन्यथा सदरची फी कार्यालयात बँक खातेमध्ये जमा करून जमा केलेली पावती सादर केल्यास कोऱ्या निविदा प्राप्त होतील.
३) अंदाजपत्रकातील १२% अथवा १८% जी.एस.टी. हा मूळ अंदाजपत्रकातील असल्याने मंजूर ठेकेदारांना सदरचा जी.एस.टी. हा मंजूर निविदेनुसार अदा केला जाईल.
४) खाडाखोड व दुरुस्ती केलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
५) निविदा मंजूर वा नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहेत.
६) मंजूर निविदा धारक ठेकेदारास रुपये ५००/- बाँड पेपरवर असणाऱ्या अटी शर्तींना अधीन राहून स्वखर्चाने करारनामा करणे बंधनकारक राहील.
७) मंजूर विकास कामाचा निधी हा संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे अदा केला जाईल.
८) प्राप्त निविदा दि ११/०७/२०२६ रोजी सकाळी ठीक स. १२:०० वा. उघडण्यात येतील.
९) निविदा धारकाने निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबतची सूचना ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सही/-
**सरपंच**
**ग्रा.पं.नांदवी**

सही/-
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रा.पं.नांदवी**

# पंधरा दिवसांत पुलाचा भराव खचला

## • संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी • शरद पवार गटाची आक्रमक भुमिका

| माणगाव | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव येथील काळ नदीवरील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाच्या भरावाला अवघ्या पंधरा दिवसांत तडे जाऊन खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदार, अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून शासनाचे झालेले नुकसान वसूल करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन बुधवारी (दि.१) माणगावचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्यासह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उपविभागीय अधिकारी व कार्यकारी अभियंता यांना देखील देण्यात आले आहे.



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर यापूर्वीही निकृष्ट कामामुळे अनेक अपघात झाले असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तरीही संबंधित यंत्रणा व ठेकेदारांवर कठोर कारवाई होत नसल्याने अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळत आहे. जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अशा निष्काळजीपणाला कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घालता येणार नाही. या बाबींचा गांभीर्याने विचार करून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्यावतीने निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे कि, माणगाव येथील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील काळ नदीवरील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाच्या भरावाला अवघ्या पंधरा दिवसांतच तडे जाऊन मोठमोठे खड्डे पडण्यास सुरुवात झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून संबंधित ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाचे हे ज्वलंत उदाहरण आहे. सार्वजनिक बांधकामांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही नागरिकांना सुरक्षित रस्ते मिळत नसतील, तर ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच पुलाच्या भरावाला तडे जाणे आणि भराव खचणे म्हणजे कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. रायगड जिल्ह्यात पुढील काळात मुसळधार पाऊस होणार असल्याने ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे काळ नदी पुलाच्या भरावाच्या निकृष्ट कामाची उच्चस्तरीय व स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्यात यावी, संबंधित ठेकेदार, कामाची देखरेख करणारे अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधित ठेकेदार व दोषी अधिकाऱ्यांकडून सक्तीने वसूल करण्यात यावे, पुलाचा भराव, संरचना व संपूर्ण कामाची गुणवत्ता तातडीने तपासून आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी, भविष्यात अशा निकृष्ट कामांना आळा घालण्यासाठी संबंधित अधिकारी व यंत्रणांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुलाची सुरक्षितता तपासून नागरिकांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होणार नाही, याची तात्काळ दक्षता घेण्यात यावी. जिल्ह्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून, आपण या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीसह श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष संताजी पवार, जिल्हा सचिव श्रीहर्ष कांबळे, तालुकाध्यक्ष राजू रोडेकर, महाड शहराध्यक्ष पराग वडके, कार्यकर्ते स्वप्नील सुतार व सीताराम भोनकर आदी उपस्थित होते.

# पोलादपूर शहरात सहावा स्कायवॉक



**■ बुधवारपासून गर्डर टाकण्याच्या कामाला सुरूवात**

**■ महामार्गामुळे दोन भाग झाल्याने पुलाची गरज**

| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर शहरातील श्री काळभैरवनाथ मंदिर आणि प्रभातनगर पूर्व दरम्यान बुधवारी (दि.१) स्कायवॉक उभारण्यासाठी गर्डर टाकण्याचे काम जलदगतीने सुरू झाले आहे. त्यामुळे हा स्कायवॉक पूर्ण झाल्यानंतर पोलादपूर शहरातील सहावा पुल ठरणार आहे.

पोलादपूर शहरात मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान महामार्ग अंडरपास म्हणजे जमिनीखालून मध्यभागी ३५ फूट खोल खंदकातून नेण्यात आला आहे. त्यामुळे पोलादपूर शहराचे दोन भाग झाले आहेत. त्यामुळे पोलादपूर शहरातील मूळ वस्तीसह तांबडभुवन, साईनाथनगर, घाटे आवाड, सैनिकनगर, गोकुळ नगर, जाखमातानगर, प्रभातनगर पश्चिम, नव्याने उभारण्यात आलेल्या मंगलमूर्ती व समृद्धी अपार्टमेंट या लोकवस्त्यांसाठी तांबडभुवन, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, पोलीस ठाण्याची जुनी इमारत, एसटी बस स्थानकातून बसेस बाहेर पडण्याचा मार्ग व बसेस स्थानकात जाण्याचा मार्ग तसेच पाचवा पुल गोकुळ नगर रस्त्याकडे जाण्यासाठी उभारण्यात आला. मात्र, तरीदेखील श्री काळभैरवनाथ मंदिर आणि प्रभातनगर पूर्व येथील लोकवस्ती व शालेय विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी स्कायवॉक उभारण्यासाठी लोकनेत्यांनी संबंधितांनी निवेदने देऊन पाठपुरावा केला. त्यानंतर आता या स्कायवॉकच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. बुधवारी स्कायवॉकसाठी उभारलेल्या तीन पिलर्सवर आडवे चार गर्डर टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. त्यानंतर हे चार गर्डर पिलर्सवर एकसंध करण्यासाठी काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्यानंतर सर्वात शेवटी या स्कायवॉकवर जाण्या-येण्यासाठी जिन्यांचे बांधकाम केले जाणार आहे. सद्यस्थितीत हा स्कायवॉक मंगलमूर्ती अपार्टमेंट आणि प्रभातनगर पूर्व या लोकवस्तीला जोडणारा दुवा ठरणार असल्याचे दिसून येत आहे.

# निवडक

## डॉ. रवींद्र भुरकुंडे यांचा गौरव

**माणगाव** : कातकरी समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक इतिहासात अभिमानाची नोंद करणारी उल्लेखनीय कामगिरी करत डॉ.




रवींद्र भुरकुंडे यांनी डॉक्टरेट (विद्या वाचस्पती) पदवी संपादन केली आहे. कातकरी समाजातील पहिले विद्या वाचस्पती होण्याचा मान त्यांनी मिळवून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. ''कातकरी समाजाचा इतिहास : १९७५ ते २००६'' हा त्यांच्या संशोधन प्रबंधाचा मुख्य विषय असून, कातकरी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व ऐतिहासिक वाटचालीचा सखोल अभ्यास या प्रबंधातून करण्यात आला आहे. या विषयाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठी हा प्रबंध महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार असून, भविष्यातील संशोधनासाठी तो अधिकृत व मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून उपयोगी पडणार असल्याचे जाणकारांनी मत व्यक्त केले आहे. वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र कोकण प्रांत कार्यकारिणीच्यावतीने डॉ. रवींद्र भुरकुंडे यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.




(छायाचित्र: गणेश चोडणेकर)

## वैशाली जंगम यांची थेट नियुक्ती

**आगरदांडा** : मुरुडमधील सुरई अंगणवाडी येथील मदतनीस वैशाली जंगम यांना सुरई आदिवासी वाडी येथील अंगणवाडी सेविका पदावर थेट नियुक्ती करण्यात आली आहे. मुरूड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ व बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य गणेश नाकती, पर्यवेक्षिका सुवर्णा चांदोरकर, कनिष्ठ सहाय्यक आशा सोनकुसरे व श्रुतिका भगत आदिंसह मान्यवर उपस्थित होते. तसेच, उपस्थितांनी त्यांच्या नियुक्तीचे स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**पाली/गोमाशी** : सुधागड तालुक्यातील नांदगाव येथील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात माणगावच्या विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राच्यावतीने गरीब, गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पेन, कंपसपेटी, पेन्सिल, दप्तरे इत्यादी शालेय साहित्य देण्यात आले. शैक्षणिक अडचणींवर मात करून विद्यार्थ्यांनी शिक्षणाची वाट धरावी, या उद्देशाने केंद्रातर्फे दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो. यावेळी विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राचे सचिव गोखले, माजी प्राचार्य बबन पालवे, प्राचार्य अशोक शिंदे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

## पहलाज निहलानींना आदरांजली

**माथेरान** : सिनेसृष्टीवर अधिराज्य गाजविणाऱ्या दिग्गजांपैकी सुप्रसिद्ध दिग्दर्शक पहलाज निहलानी यांचे दि.४ जून रोजी मुंबईत निधन झाले होते. त्यांचा बंगला माथेरानमध्ये असून, ते नेहमीच याठिकाणी भेट देत असत. येथील स्थानिकांशी त्यांचे घनिष्ठ ऋणानुबंध जुळले होते. त्यांच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून, त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी



दि.१ जुलै रोजी हॉटेल पॅनोरमामध्ये छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांच्या पत्नी नीता निहलानी यांसह गावातील नागरिक, लोकप्रतिनिधींनी उपस्थिती दर्शवली. यावेळी अनेकांनी आपले विचार व्यक्त करून पहलाज निहलानी यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.

# कृषी दिनानिमित्त सामूहिक वृक्षारोपण



(छायाचित्र: संजय गायकवाड)

| कर्जत | प्रतिनिधी |

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि राज्याच्या हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित होणारा कृषी दिन कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात पार पडला. यावेळी सहयोगी संशोधन संचालक डॉ. बी. डी. वाघमोडे यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी डॉ. महेंद्र गवई, डॉ. नामदेव म्हसकर, डॉ. मीनाक्षी केळुस्कर, डॉ. जीवन कदम, महेशकुमार, रावे विद्यार्थी ज्ञानेश्वर पाटील, अथर्व शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कृषी दिनानिमित्त सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी, मजूर तसेच रावे विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग घेऊन श्रमदानातून येथील केंद्राचा भात पैदास विभाग, उद्यानविद्या विभाग, विश्रामगृहासमोरील परिसर व मॉडेल कृषी विद्या विभागात मोठ्या प्रमाणावर सामूहिक वृक्षारोपण करत जवळपास ४८० वेगवेगळ्या फळे आणि शोभिवंत वृक्षांची लागवड केली. केंद्राच्या इतिहासात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता.

## चायनिज सेंटरवर पोलिसांची कारवाई

**आपटा** : वावेघर येथील विवेक चायनीज सेंटरवर परवानगी नसताना किंवा कोणताही वैद्य परवाना नसताना मद्यपानाची सर्व सुविधा ग्राहकांना पुरवल्या जात होत्या. त्या ठिकाणी मद्यपानाच्या रिकामी बाटल्यांचा देखील खच पडलेला आहे. दरम्यान, रसायनी पोलिसांनी या चायनीज सेंटरवर धाड टाकून सनी रामदास चव्हाण याला अटक केली आहे. तसेच, रसायनी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच, वावेघर येथील साई बालाजी चायनीज सेंटरवर देखील याच प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाणी तुंबल्याने नागरिकांचे हाल

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा समजला जाणारा कचेरी रोड पावसाळा सुरू होताच पुन्हा एकदा जलमय झाला आहे. त्यामुळे तुंबलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या संतापाला उधाण आले आहे. दरवर्षी पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत असतानाही आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

कचेरी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गटारे बांधण्यात आली असली तरी त्या गटारांतील पाणी पुढे वाहून जाण्यासाठी कोणताही निचऱ्याचा मार्ग उपलब्ध नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरच साचून राहते. परिणामी कचेरी रोडपासून कोकण रेल्वे पुलापर्यंत अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी तुंबते आणि संपूर्ण परिसर जलमय होतो. रस्त्यावर साचलेले घाण, चिखल आणि दुर्गंधीयुक्त पाणी नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. शाळा आणि महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना नाक मुठीत धरून या रस्त्यावरून जावे लागते. महिलांना पाण्यातून वाट काढताना अपघाताची भीती सतावत असते, तर ज्येष्ठ नागरिकांनाही जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागत आहे. पाण्याखाली खड्डे लपल्याने अपघात होण्याची शक्यताही वाढली आहे.

## मुरुडध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

**मुरुड-जंजिरा** : कृषी दिनाचे औचित्य साधून मुरुड तालुका पंचायत समितीच्यावतीने कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ, गट विकास अधिकारी डॉ. राजेंद्रकुमार खताळ, एकात्मिक बाल विकास सेवा विभागाचे प्रमुख संजय शेडगे, तालुका कृषी अधिकारी नराळे, सहायक गट विकास अधिकारी मंगेश पाटील, विस्तार अधिकारी कृषी वसंत दळवी, विस्तार अधिकारी सांख्यिकी प्रसाद माळी, अधिकारी, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'ऑक्सिजन पार्क' संकल्पनेला प्रारंभ

| माणगाव | प्रतिनिधी |

कृषी दिन तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून कशेणे गावात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम रोहा कृषी विज्ञान केंद्र आणि कशेणे येथील श्री हनुमान शेतकरी विकास गटाच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात पार पडला. यावेळी पर्यावरण संवर्धन आणि भविष्यात कशेणे परिसर 'ऑक्सिजन पार्क' म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने कडुलिंबाच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात कोळवणकर यांच्या नर्सरीपासून झाली. त्यानंतर ग्रुप ग्रामपंचायत तळाशेतचे प्रांगण,




जिल्हा परिषद रुग्णालय इंदापूर, कालवा परिसर तसेच जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात कडुलिंबाची झाडे लावण्यात आली. यावेळी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक झाड वाढविण्याची जबाबदारी स्वीकारत पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली. तसेच, उपस्थित ग्रामस्थांना त्यांच्या परसबागेत लागवड करण्यासाठी प्रत्येकी एक रोप मोफत वितरित करण्यात आले. या कार्यक्रमाला पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उपसभापती मनीषा मालोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश मालोरे, कृषी विज्ञान केंद्र, रोहा येथील शास्त्रज्ञांची टीम तसेच कशेणे गावातील शेतकरी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# हस्तगत केलेले मोबाईल केले परत

| महाड | प्रतिनिधी |

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याने हरवलेल्या मोबाईलच्या तक्रारींचा प्रभावी तांत्रिक तपास करून तब्बल ५ लाख ३९ हजार रुपये किमतीचे १३ मोबाईल हस्तगत करत ते संबंधित तक्रारदारांच्या ताब्यात दिले आहेत. सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार दीपक बल्लाळ यांनी पोर्टलच्या माध्यमातून तांत्रिक तपास करत विविध ठिकाणांहून हरवलेले मोबाईल शोधून काढले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित तक्रारदारांना त्यांचे मोबाईल परत करण्यात



आले. परत करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये विविध कंपन्यांच्या मोबाईलचा समावेश असून, एकूण १३ मोबाईलची अंदाजे किंमत ५.३९ लाख रुपये इतकी आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे तसेच पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याने नागरिकांना आवाहन केले की, मोबाईल हरवल्यावर विलंब न करता जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी आणि पोर्टलवर देखील नोंदणी करावी. त्यामुळे हरवलेला मोबाईल शोधण्यास आणि परत मिळवून देण्यास मोठी मदत होते, असे सांगितले.

## अध्यक्षपदी प्रकाश बाविस्कर

**पनवेल** : मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाच्या राज्यस्तरीय संयुक्त बैठकीत सर्व संलग्न असोसिएशनच्या प्रतिनिधींच्या एकमताने प्रकाश बाविस्कर यांची महासंघाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच, प्रमोद पाटील यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. दरम्यान, या बैठकीत महासंघाच्या भविष्यातील संघटनात्मक विस्तार, राज्यव्यापी कार्ययोजना आणि बांधकाम उद्योगाच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.



# अंमली पदार्थ विरोधी जनजागृती

| उरण | प्रतिनिधी |

अंमली पदार्थ विरोधी दिन सप्ताहनिमित्त उरणमधील मोरा सागरी पोलीस ठाण्याच्यावतीने मंगळवारी (दि.१) करंजा नौदल आस्थापना येथील शिवाजी सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला केंद्रीय विद्यालय करंजा व नौदल बाल विद्यालयातील सुमारे ५२० ते ५५० विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. केंद्रीय विद्यालय करंजाचे प्राचार्य राजेश कुमार आणि नौदल बाल विद्यालयाच्या प्राचार्या पायल या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. यावेळी मोरा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल काटवानी आणि दर्शन नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## शेतकऱ्यांना उदरनिर्वाहाचा नवा मार्ग | जंगली मेव्यातून रोजगाराची संधी

# आदिवासी कुटुंबियांना मोहाचा आधार

| नेरळ | प्रतिनिधी |

मोहाचे झाड हे अनेक कारणांनी शेतकऱ्याला मदतगार असते. मात्र, या झाडावर येणारे फळ आणि त्या फळातील बिया या अनेक कुटुंबांना रोजगार देणाऱ्या ठरत आहेत. त्यामुळे लांबलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

कर्जत तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागामध्ये मोठ्या प्रमाणात जंगल आहे. या जंगलात मोठ्या प्रमाणावर जंगली मेवा आदिवासी लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. यावर्षी पाऊस उशीरा सुरू झाल्यामुळे जंगलातील मोहाच्या झाडांची फळे मोठ्या प्रमाणात जमिनीवर गळून पडल्या होत्या. त्यामुळे आदिवासी



कुटुंबातील आबालवृद्ध सकाळीच जंगलात जाऊन या बिया गोळा करत असतात. त्यानंतर त्या बिया गावोगावी रस्त्यांच्या कडेला किंवा घरासमोरील अंगणात मोठमोठे ढीग करून उन्हात वाळवण्यासाठी पसरवून ठेवण्यात येतात. पावसाच्या सरी कोसळण्यापूर्वी या बिया चांगल्या कडक वाळवणे गरजेचे असते.

मोहाच्या झाडांची फळे मोठ्या प्रमाणात जमिनीवर गळून पडतात. मृग नक्षत्र संपून जून महिन्याचा पंधरवडा उलटल्यानंतर काही प्रमाणात पावसाने हजेरी लावली. पाऊस लांबणीवर पडल्यामुळे शेतीची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे बळीराजा चिंतेत पडला होता. मात्र, निसर्गाच्या या लहरीपणावर मात करत दुर्गम भागातील आदिवासी बांधवांनी आपल्या उदरनिर्वाहाचा नवा मार्ग शोधला आहे. पाऊस लांबल्यामुळे मिळणाऱ्या कडक उन्हाचा फायदा घेत सध्या जंगलातून मोहाच्या बिया गोळा करून त्या वाळवण्याच्या कामाला वेग आला आहे. या वाळलेल्या बियांचा वापर प्रामुख्याने तेल काढण्यासाठी केला जातो. स्थानिक भाषेत त्याला टोळचे तेल किंवा मोहाचे तेल असे म्हणतात. या बिया फोडून आतील मगज काढला जातो आणि वाळवून, त्या नंतर घाण्यावरून शुद्ध तेल काढले जाते. बाजारातील महागड्या खाद्यतेलाला पर्याय म्हणून आदिवासी बांधव या शुद्ध तेलाचा वापर दैनंदिन स्वयंपाकात करतात. हे तेल हाडे मजबूत करण्यासाठी, सांधेदुखीवर आणि विविध त्वचेच्या आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते.

दरम्यान, पाऊस लांबल्याने शेतीची कामे बंद आहेत, त्यामुळे हाताला काम नव्हते. परंतु, निसर्गानेच आम्हाला हा दुसरा पर्याय दिला आहे. या बिया वाळवून बाजारात विकल्यास चांगला भाव मिळतो, त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांत आदिवासी कुटुंबियांना आर्थिक आधार मिळण्यास मदत झाली आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : अडचणींची तीव्रता अधिक राहील. पूर्वीचे नातेसंबंध अधिक दृढ होतील. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल.
- **वृषभ** : .किरकोळ प्रश्नांनी विचलित होऊ नका. धैर्य, संयम लाभदायक ठरेल. महत्त्वाच्या भेटी होतील.
- **मिथुन** : कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. विद्यार्थ्यांना अडचणी येतील. गुंतवणूक विचारानं करायला हवी.
- **कर्क** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. नोकरीच्या प्रयत्नात यश मिळेल. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील
- **सिंह** : स्थावर प्रश्नात लाभ होईल. धार्मिक कार्याचा आनंद घ्याल. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **कन्या** : मनाजोग्या घटना घडतील. अनावश्यक खरेदी टाळायला हवी. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल.
- **तूळ** : कलाकारांचा उत्साह वाढेल. व्यवसायात बदलाच्या हालचाली होतील. सरकारी कामं पार पडतील.
- **वृश्चिक** :'केल्याने होत आहे रे...'ची प्रचिती येईल. कायदेशीर बाबीत विचारानं रहावं. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : .व्यापार–उद्योगात उलाढाल वाढेल. नोकरीत कामाची प्रशंसा होईल, भावंडांचं उत्तम सहकार्य राहील.
- **मकर** : महत्त्वाच्या कामांना विलंब लागेल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. हातून दानधर्म घडेल.
- **कुंभ** : प्रियजनांच्या भेटी होतील. कौटुंबिक सहलीचे बेत आखाल. स्थापत्य क्षेत्रात नव्या संधी लाभतील.
- **मीन** : जमा–खर्चाचा योग्य मेळ घालावा. मुलांच्या प्रगतीत अडचणी येतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.

स्टाईल स्टेटमेंट

## रंग मान्सून फॅशनचे

पावसाळा सुरू झाला आहे. पावसात भिजल्यानंतर कपडे, मेक अप खराब होतो. त्यामुळे फॅशनचे काही वेगळे फंडे वापरावे लागतात. मान्सूनमधल्या या स्टायलिंग टिप्स तुमचं व्यक्तिमत्त्व नक्कीच खुलवतील.

* सदाबहार डेनिम पावसाळ्यात बाजूला ठेवा. डेनिम जॅकेट, स्कर्ट, जीन्स, शर्ट या दिवसात वापरणं टाळा. पाण्यामुळे डेनिम फुगतं तसंच ते वाळायलाही बराच वेळ लागतो. पावसात भिजल्यानंतर तुम्हाला याचा त्रास होऊ शकतो. डेनिमऐवजी मोकळ्याढाकळ्या कॉटन बॉटम्सवर भर द्या. सध्या कॉटन पँट्सची चलती आहे. त्या तुम्ही घालू शकता. यासोबत इतरही बरेच पर्याय आहेत.

* या दिवसांमध्ये शॉर्ट ड्रेस ट्राय करता येतील. क्रॉप टॉप्स, शॉर्ट स्कर्ट पावसाच्या पाण्याने खराब होत नाहीत. कॅज्युअल लूकसाठी ड्रॉ स्ट्रिंग ड्रेस, मिडी स्कर्टस घालता येतील. कम्फर्टसाठी मॅक्सी ड्रेस, स्पोर्टी लूकसाठी किमोनो स्लीव्ह शर्ट ड्रेस आणि रॅप्स ट्राय करा. **(क्रमश:)**

## ३ जुलै

दिन विशेष

**१९८०** : भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंग याचा जन्म.
**१९९८** : 'ए मेरे वतन के लोगों...' या प्रसिद्ध गीताचे गीतकार कवी प्रदीप यांना दादसाहेब फाळके पुरस्कार जाहीर.
**२००१** : सुधीर फडके यांना राज्य सरकारचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर.
**२०१८** : भारतीय नौदलाचे माजी प्रमुख ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार संपन्न

सफर देशांची

## असा हा लाओस

लाओस हा दक्षिण–पूर्व आशियातला देश आहे. तो चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला आहे. चीन, व्हिएतनाम, म्यानमार, कंबोडिया आणि थायलंड हे लाओसचे शेजारी देश. व्हिएंटिएन ही लाओसची राजधानी. एके काळी लाओसवर फ्रान्सचं राज्य होतं. १९४९ मध्ये लाओसला स्वातंत्र्य मिळालं. पण त्यानंतर देशात अंतर्गत युद्ध पेटलं. १९७५ मध्ये या देशाला स्थैर्य मिळालं आणि इथे लोकशाही अस्तित्त्वात आली. कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्त्वाखाली इथे सरकार बनलं. इथले लोक 'लाओ' ही भाषा बोलतात. या देशातले बहुसंख्य लोक बौद्ध असून तांदूळ हे इथलं प्रमुख पीक आहे. या देशाचा बराचसा भाग डोंगराळ आहे. फोउ बिया हे लाओसमधलं सर्वात उंच शिखर आहे. इथलं हवामान उष्ण असतं. मे ते नोव्हेंबर दरम्यान इथे पावसाळा असतो. डिसेंबर ते एप्रिल या काळात हिवाळा असतो. प्राचीन काळात लाओसला 'लॅन एऑंग' असं म्हटलं जायचं. लाखो हत्तींची भूमी असा याचा अर्थ. लाओसमध्ये भरपूर हत्ती आहेत. यासोबतच अस्वलं, वाघ आणि कोब्रा असे प्राणीही आहेत. पण इथली जंगलं झपाट्याने कमी होत आहेत. मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड ही लाओसची मुख्य समस्या आहे.

### पंचांग

**शुक्रवार, ३ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
निज ज्येष्ठ कृ. ३, चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : श्रवण, योग : विष्कंभ,
सूर्योदय ६.०८ सूर्यास्त ७.१८

### फॉरवर्ड्स

**दुनियाँ फ़रेब करकें हुनरमंद हो ग़यी...**

**हम ऐतबार करकें गुनहगार हो ग़ये...!**

आरोग्यमंत्र

## कसं ठरतं मुलगा की मुलगी?

एखादी स्त्री बाळंत होईपर्यंत नातेवाईकांच्या विशेषत: तिच्या आईच्या जीवात जीव नसतो. केव्हा एकदा मुलगा झाल्याची बातमी कानावर येते असे त्यांना झालेले असते. आपला समाज पुरूषप्रधान असल्यामुळे व मुलगा हा कुलदीपक, म्हातारपणाचा आधार वगैरे कल्पना रुजलेल्या असल्यामुळे मुलगा झाला नाही तर दुसरे लग्न करणे, बायकोला टाकून देणे अशा गोष्टी घडतात. मुलगा होणार वा मुलगी हे कसे ठरते, यामागचे शास्त्रीय कारण बघितले; तर मुलगा न होण्यात स्त्रीची काहीच चूक नसते, असे आपल्या लक्षात येईल.



मूल होण्यासाठी पुरुषांचा शुक्राणू व स्त्रीबीज यांचे मिलन होणे आवश्यक असते. यालाच गर्भधारणा असे म्हणता येईल. लिंग ठरवण्यासाठी माणसाच्या शुक्राणूत व स्त्रीबीजात लिंगसूत्रे असतात पुरुषांत एक्स व वाय ही लिंगसूत्रे, तर स्त्रीमध्ये एक्स व एक्स अशी लिंगसूत्रे असतात. पुरुषांच्या काही शुक्राणूत एक्स तर काही शुक्राणूत वाय हे लिंगसूत्र असते. सर्व स्त्रीबीजात मात्र एक्स हेच लिंगसूत्र असते. पुरुषांचे एक्स व स्त्रीचे एक्स लिंगसूत्र एकत्र आले, तर मुलगी होते. पुरुषाचे वाय व स्त्रीचे एक्स ही गुणसूत्रे एकत्र असल्यास आल्यास मुलगा होतो. अर्थात पुरुषाकडून वाय लिंगसूत्र मिळाल्याखेरीज मुलगा होऊ शकत नाही. या दृष्टीने बघायला गेल्यास मुलगा न होण्यामागे पुरुष जबाबदार असतो. स्त्रीला दोषी मानणे हे अन्यायकारक आहे. हे शास्त्रीय सत्य सर्व समाजाला माहीत होणे आवश्यक आहे. त्यामुळे स्त्रियांवर अकारण होणारे अत्याचार बंद होतील.

### फॅशन पॅशन

दोस्तांनो, बाजारातून आणलेले डेनिम आपण तसेच वापरतो. पण या साध्या डेनिम्सवर बरीच कलाकुसर करता येते. डेनिमचं प्रत्येक प्रावरण मस्त ट्रेंडी बनवता येतं. यासाठी नेमकं काय करता येईल? जाणून घेऊ या.

* प्लेन डेनिम्स खुलवण्यासाठी प्रिंट्सचा वापर करता येईल. आवडत्या चित्रपटाचं पोस्टर, ग्राफिक्स किंवा तुमच्या आवडीचं काहीही जॅकेट किंवा शर्टवर प्रिंट करून घेता येईल. अशी सेवा देणाऱ्या बऱ्याच कंपन्या आहेत. तिथून तुम्ही डेनिम कस्टमाइज करून घेऊ शकता. अर्थात तुमचा स्वत:चा फोटो प्रिंट करू नका. **(क्रमश:)**

## ऑफबिट ऑप्शन्स

करिअरवाटा

करीअरचा विचार करताना काही ऑफ बीट म्हणजेच फारशा प्रचलित नसणाऱ्या अभ्यासक्रमांची निवड करायची असेल खालील पर्यायांचा अवश्य विचार करा.



* ह्युमॅनिटीजचा अभ्यास ही संकल्पना आता नवीन राहिलेली नाही. पण इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये हा अभ्यासक्रम वेगळ्या रूपात आहे. सामाजिक विज्ञान, ह्युमॅनिटीज आणि नैसर्गिक विज्ञान यांच्यातली दरी कमी करण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे. मॅपिंग सायन्स, सोसायटी रिलेशनशीप आणि जर्नलिझम फॉर सायंटिस्ट्स असे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यामुळे विज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला मदत होईल. * भूकंप, पूर, त्सुनामी यांसारख्या नैसर्गिक तसंच आगीसारख्या मानवनिर्मित आपत्ती वारंवार येत असतात. या आपत्तींना समोरं जाण्यासाठी कुशल तज्ज्ञांची गरज असते. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमध्ये डिझास्टर मॅनेजमेंट म्हणजे आपत्ती व्यवस्थापनावरचा अभ्यासक्रम आहे. * नवी दिल्लीच्या श्रीराम कॉलेजमध्ये ग्लोबल बिझनेस ऑपरेशन्सचा पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय नातेसंबंध आणि धोरणं यांची सरमिसळ पहायला मिळते.

खेचाखेची

### १000 पानांचे पुस्तक

एक हजार पानांचे पुस्तक वाचायला किती वेळ लागेल?

**लेखक** : सहा महिने.

**डॉक्टर** : दोन महिने.

**वकील** : एक महिना.

**अभियंता** : परीक्षा कधी आहे ते सांगा. रात्रभरात वाचून काढू.

वेगळं काही

अरूणाचल प्रदेशमधल्या लोअर सुबंसरी जिल्ह्यातल्या झीरो व्हॅलीमध्ये शेतीची सर्व कामं महिला हातांनी करतात. इथे महिलाच कुटुंबप्रमुख असतात. झीरो व्हॅली समुद्रतळापासून ५,६०० फूट उंचीवर आहे. या परिसरात अपातिनी जमातीचे लोक रहातात. या जमातीतले लोक पाण्याचा वापर जपून करतात. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं महत्त्व ते जाणतात. शेतांमधल्या छोट्या डबक्यांच्या देखभालीची जबाबदारी या भागातली प्रत्येक व्यक्ती घेते. वर्षातला एक दिवस प्रत्येकाने या डबक्यांच्या देखरेखीसाठी द्यायचा असतो. या डबक्यांमध्ये मत्स्यपालनही केलं जातं. इथे शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर होत नाही. घरांमधल्या ओल्या कचऱ्यापासून खत तयार केलं जातं.

## मुलांशी संवाद हवा

संगोपन

बरेचदा काहीही कारण नसताना मुलं खोटं बोलू लागतात. अशा परिस्थितीत पालकांनी त्यांच्याशी हळूवारपणे संवाद साधणं गरजेचं आहे. यामागील कारणंही शोधायला हवी.



* काही पालक मुलांना नेहमी हे करू नको, ते करू नको या पद्धतीने टोकत असतात. अशा वेळी मुलांमध्ये ते काम करून पाहण्याची उत्सुकता निर्माण होते. उत्कंठा शमवण्याचा प्रयत्न केल्यास पालक रागवतील या भीतीने मुलं खोटं बोलतात. त्यामुळे एखादी कृती चुकीची आहे हे मुलांना समजावताना ती का चुकीची आहे हे देखील सांगा. * मुलांसमोर पालकांनी खोटं बोलणं टाळावं. यातून मुलाला तुमच्याबद्दल विश्वास वाटू लागतो. अशा वेळी मुलांशी मैत्री करणं सहज शक्य होतं. * पालकांनी मुलांना त्यांची चूक शांत स्वरात लक्षात आणून देणं गरजेचं आहे. अशा वेळी मुलांना रागवल्यास चूक स्वीकार करण्याची शक्यता कमी असते. * अनेक पालक व्यस्ततेमुळे मुलांना वेळ देऊ शकत नाहीत. अशा वेळी संवाद साधनांच्या सहाय्याने का होईना, मुलांशी सतत संवाद साधत राहणं गरजेचं आहे.

## सुडोकू १२२


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३ | | ७ | | |
| | ४ | | ९ | | ८ | | | |
| ३ | | | २ | | ७ | | | |
| ७ | | | ८ | | | ५ | ४ | |
| | १ | ४ | | ५ | | ८ | ७ | |
| | ५ | ८ | | | १ | | | ३ |
| ८ | | | ६ | | ३ | | | ९ |
| | | | ७ | | ९ | | २ | |
| | | २ | | ४ | | | | |

**टीप** -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | ७ | ३ | ५ | ८ | ४ | ६ | २ |
| ८ | ३ | ६ | १ | ४ | २ | ५ | ९ | ७ |
| ४ | ५ | २ | ६ | ७ | ९ | १ | ८ | ३ |
| ९ | ८ | ३ | ५ | ६ | १ | २ | ७ | ४ |
| ७ | २ | ५ | ८ | ९ | ४ | ६ | ३ | १ |
| ६ | १ | ४ | ७ | २ | ३ | ९ | ५ | ८ |
| ३ | ४ | १ | ९ | ८ | ६ | ७ | २ | ५ |
| २ | ७ | ९ | ४ | ३ | ५ | ८ | १ | ६ |
| ५ | ६ | ८ | २ | १ | ७ | ३ | ४ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १२२



**आडवे शब्द :-**
१) घरातलाच एखादा मनुष्य गराच्या नाशास कारणीभूत ठरतो या अर्थाची एक म्हण
८) उदा, दिल्ली, कोलकाता, मुंबई, चेन्नई
११) आवाज, ध्वनी
१२) एक तारवाद्य
१३) मृत्यू नसलेला
१४) ताक घुसळून पातळसर केलेले पेय
१६) बांगलादेशाचे चलन
१८) मज्जाव
२०) वहिवाट,जाणे–येणे
२२) खराब, नासलेला
२४) निमगोरा
२६) लाज
२८) ढीग
३०) साहित्यातील नऊ भावना
३१) खोडण्याचे साधन
३३) धुणे
३४) तीन मजल्याची इमारत
३६) प्रश्नोत्तरे
३८) तुरुंग
३९) जास्तीतजास्त
४०) कापड विणताना शेवटी सोडलेले धागे
४१) कॉम्प्युटरला मराठी शब्द
४३) उगाच, विनाकारण
४६) लाकडी जिना
४८) मुख्य पुरुष(फा), श्रेष्ठ
४९) शूर, पराक्रमी
५१) जयंत ***** एक खगोल शास्त्रज्ञ
५३) एक श्वासरोग
५४) यमनगरी
५६) माफी असावी
५८) गवत, गुरांचे एक खाद्य
५९) त्वरित, चटकन
६१) लहानसान
६३) कर्णेंद्रिय
६४) नर्मदा नदीचे एक नाव
६६) नाश, पांगापांग
६८) निष्णांत, वाकबगार
७०) सूट
७२) होडी
७३) रीत, पद्धत
७४) मध्यस्थ
७६) कावळा
७७) मलईची घट्ट बासुंदी
७९) मोठा हातोडा
८०) काढलेली सुट्टी
८२) किरकोळ सामान
८६) दोरी
८७) प्रसन्न होऊन दिलेली देणगी
८९) फणसाची पोळी
९०) वेळ घालविणे
९१) मोठी बहीण
९२) वर्ष, साल.

**उभे शब्द :-**
१) वाईट पुत्र असण्यापेक्षा मुळीच नसलेले बरे या अर्थाची एक म्हण
२) कोवळा अंकुर
३) चहाटळ
४) मच्छर
५) आप्तजनांचा घोळका
६) धातूचा धागा
७) इच्छा
८) वंदनाचा एक शब्द
९) धाक, भीती
१०) पाणी
१५) सत्वांश
१७) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
१८) अत्यंत सामर्थ्यवान मनुष्य
१९) परमेश्वर
२१) चांदणी
२३) वन, रान
२५) अनेक विद्यार्थी राहत असलेली इमारत
२७) पहारेकरी
२९) कारण
३१) पराग
३२) आजतागायत
३५) सुगंध
३६) पूर्ण भरतीची वेळ, पूर्ण ऐक्य
३७) बट्टा, कलंक
३८) उसाचा कढविलेला घट्ट रस
४२) जागविणारा आवाज
४४) विविध, अनेक
४५) नवाकोरा
४७) संतोष,आनंद
५०) रक्षण करणारा
५२) मोठी कळशी
५५) मनाचा ओढा
५७) एक सुगंधी वनस्पती
५८) नोकर
६०) पर्णवस्त्र
६१) आतच्या विरुद्ध (हिं.)
६२) यथाशास्त्र
६३) हा किटक रात्री चमकतो
६५) दुर्गंधी येऊ लागलेला
६७) घाई, त्वरा
६९) शंकराला वाहण्याचे त्रिदल
७१) गोणपाटाचे कापड
७३) उन्हाची तीव्रता
७५) रावण
७६) बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दोर
७८) फणसाचा एक प्रकार
८१) मुलीचा नवरा, जामात
८३) वसुधा
८४) भेग, चीर
८५) शरीर
८८) सेवक, गुलाम

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कळवे-दादर ग्रामस्थांचा रास्ता रोको

| हमरापूर | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील कळवे दादर रस्त्यावर ॲक्सिस बँकेसमोर पाणी साचते त्यामुळे ग्रामस्थांचा रहदारीचा रस्ता बंद होत असल्यामुळे कळवेसह इतर गावातील ग्रामस्थांनी बुधवारी पाण्यात बसून रास्ता रोको आंदोलन केले. विशेष म्हणजे साचलेल्या पाण्यात येथील ग्रामस्थांनी मासेमारी करून एक अनोखे आंदोलन केले.




कळवे रस्त्यावर पावसात येथे दोन-तीन फूट पाणी साचते. त्याचा परिणाम होऊन या रस्त्यावरून वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प होते. शालेय विद्यार्थी नोकरवर्गाला कामावर जाता येत नाही. तसेच ग्रामस्थांना खरेदीसाठी पेणला जाता येत नाही. याबाबत कळवे ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी जिल्हा पोलीस अधीक्षक, प्रांताधिकारी तहसीलदार पेण सार्वजनिक बांधकाम खात्यांना लेखी निवेदन देऊन रस्त्यावर करण्यात आली अतिक्रमणे हटवण्याची मागणी केली आहे. मात्र, वर्षभर याकडे कोणी लक्ष दिले नाही. त्यामुळे बुधवारी सकाळी साचलेल्या पाण्यात बसून कळवे येथील ॲक्सिस बँकेसमोर ग्रामस्थांनी रस्त्यात ठिय्या मांडत रस्ता रोको आंदोलन सुरू केले.

संतप्त ग्रामस्थांनी पाणी जाण्याचे मार्ग जे कारखानदारांनी बंद केले आहेत ते तातडीने खुले करावेत अशी मागणी केली.

## मासेमारी करून अनोखे आंदोलन

## अतिक्रमणे हटविण्याची मागणी

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे, तहसीलदार तानाजी शेजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नारकुल, पोलीस निरीक्षक संजय कुमार ब्राह्मणे यांनी ग्रामस्थांचे समजूत काढत सदर बंद केलेले पाण्याचे नैसर्गिक मार्ग जेसीबी आणून खुले करण्यात आले. तसेच या कामात कुणी हस्तक्षेप केला तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश यावेळी तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी दिले. यानंतर पाच तासांनी सदर आंदोलन स्थगित करण्यात आले.

> गेले वर्षभर आम्ही सार्वजनिक बांधकाम खाते व तालुका प्रशासनाकडे ॲक्सिस बँक रस्त्यावर करण्यात आलेल्या बांधकामाबाबत तक्रारी केल्या. परंतु, त्याकडे लक्षण दिल्याने आम्ही हे रास्ता रोको आंदोलन करत आहोत. या महत्त्वाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी करून पाण्याचे नैसर्गिक निचरा होण्याचे बंद करण्यात आलेले मार्ग पुन्हा खुले करा.
> **-सतीश पाटील**
> **सरपंच कळवे ग्रामपंचायत**

मात्र, पुन्हा पाणी जाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद केले तर यापेक्षा अधिक उग्र आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला. याप्रसंगी कलवे सरपंच सतीश पाटील, राजश्री पाटील, माजी सरपंच निवास पाटील, प्रमोद पाटील, सर्व सदस्य तसेच सोनखार ग्रामपंचायत सरपंच दिलीप म्हात्रे, जोहे उपसरपंच गणेश घरत, सदस्य काशिनाथ पाटील यांच्यासह कळवे, दादर, सोनखार, उर्नोली या गावातील तरुण या आंदोलनात सहभागी झाले होते.

# कृषी दिनी प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान

| धाटाव | प्रतिनिधी |

हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पंचायत समिती रोहा आयोजित बुधवारी (दि.१) जुलै रोजी कृषी दिन कार्यक्रम प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान, कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन उपक्रमांतर्गत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी रसायनमुक्त सेंद्रिय शेतीवर अधिक भर द्यावा, सकस शेती करावी, सेंद्रीय शेती काळाची गरज आहे, त्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल अशी भावना सभापती विजया पाशिलकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांसमोर व्यक्त केली. दरम्यान, तालुक्यातील अनेक प्रगतशील शेतकऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला तर आधुनिक सेंद्रिय आणि एकात्मिक शेती पद्धतींबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी महादेव सानप, सुदाम रटाटे, अनिल लहाने, भागोजी ढुंमने, श्रीकांत निवाते, प्रदीप दामूगडे, अनंता पाशीलकर, होनाजी हंबीर, ज्ञानेश्वर शेळके, रुपेश साळवी, राजेश शिर्के, एकनाथ वाडकर, गजानन डाकी आदी प्रगतशील शेतकऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी निधी जाधव, सुरेश मगर, जगन्नाथ धनावडे यांनी मनोगत व्यक्त केले. आयोजित कृषी दिन कार्यक्रमास विजया पाशीलकर, संजय मांडलूस्कर, किसनराव मोरे, निधी जाधव, उर्वशी वाडकर, सुरेश मगर, जगन्नाथ धनवडे, समृद्धी कोळी, गटविकास अधिकारी अमृता उंडरे-पाटील, विस्तार अधिकारी दिलीप पाबरेकर, सहा. गटविकास अधिकारी मनोज लाटे, प्रथमेश डाके, दीपक फाउंडेशनचे दीपक ठोसर, पाणी फाऊंडेशनचे प्रतिनिधी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी महारुद्र फडतरे यांनी केले.

## समीक्षा टेंबे हिचे निधन

**कोलाड** : लोणेरे येथील समीक्षा समीर टेंबे हिचे गुरुवार (दि.२५) जून रोजी वयाच्या १७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. तिचे तरुण वयात निधन झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



तिच्या पार्थिवावर लोणेरे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. समीक्षा ही कोलाड आंबेवाडीचे सरपंच सुरेश महाबळे यांची नात होती. तिच्या पश्चात वडील, आई, भाऊ आणि मोठा टेंबे परिवार आहे. तिचे दशक्रिया विधी शनिवार (दि.०४) जुलै, तर अंतिम धार्मिक विधी रविवार (दि.०५) जुलै रोजी होणार असल्याची माहिती निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# धामणे येथून विवाहित महिला बेपत्ता

| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील धामणे येथील २४ वर्षीय विवाहित महिला आपल्या सात महिन्यांच्या मुलासह घरातून बाहेर पडून बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी महाड पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, धामणे येथील रहिवासी प्रशांत शांताराम चिकणे (वय २८) यांनी याबाबत महाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, त्यांची पत्नी प्रिया प्रशांत चिकणे (वय २४) या दि. ३० जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता आपल्या सात महिन्यांच्या मुलगा प्रिन्स याला सोबत घेऊन बिरवाडी येथे आईकडे जात आहे, असे सासू शीतल चिकणे यांना सांगून घरातून निघून गेल्या. मात्र, त्यानंतर त्या घरी परतल्या नसून त्यांचा कोणताही संपर्क होत नसल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध करूनही त्यांचा ठावठिकाणा लागला नाही.




बेपत्ता प्रिया चिकणे यांचा रंग सावळा, उंची सुमारे ५ फूट, शरीरयष्टी मध्यम आहे. त्यांच्या डाव्या हातावर Prashant असे गोंदलेले आहे. या प्रकरणी महाड पोलीस पोलीस अधिक तपास करीत आहेत. संबंधित महिला व बालकाबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ महाड पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल महापालिकेत सेवानिवृत्तीनिमित्त गौरव

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

महानगरपालिकेत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या शहर अभियंता संजय कटेकर यांच्यासह चार अधिकारी-कर्मचाऱ्यांचा, तसेच स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या अभियंता नितीन हुद्दार यांचा गौरव सोहळा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात उत्साहात पार पडला. सन्मानितांमध्ये शहर अभियंता संजय कटेकर, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, हवालदार मनोज गायकवाड, बांधकाम विभागातील मजूर सुरेश गायकर आणि नगररचना विभागाचे अभियंता नितीन हुद्दार यांचा समावेश होता. मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, बबन मुकादम, माजी आयुक्त सुधाकर देशमुख, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, कैलास गावडे यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. माजी शहर अभियंता संजय कटेकर यांनी नगरपालिका काळापासून पनवेलच्या विकासाचे साक्षीदार असल्याचे सांगत, अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि पनवेलकरांचे आभार मानले.

# क्षत्रिय मराठा समाजाची कार्यकारिणी जाहीर

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील क्षत्रिय मराठा समाज सुधारणा संघाच्या वार्षिक अधिवेशनात नव्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये समाजहितासाठी सातत्याने कार्य करणारे युवा सामाजिक कार्यकर्ते मंगेश सावंत यांची अध्यक्षपदी, तर सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय योगदान देणारे संजोग मानकर यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली. या निवडीची घोषणा होताच समाजबांधवांसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून नव्या पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव झाला.



जिल्ह्यातील सर्वाधिक संघटित आणि प्रभावी समाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माणगाव तालुक्यातील क्षत्रिय मराठा समाजाची परंपरा गौरवशाली आहे. सन १९५२ मध्ये क्षत्रिय मराठा समाज सुधारणा संघाची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासून शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक उन्नतीसाठी मोलाचे योगदान दिले आहे. गेल्या काही वर्षांत समाजातील तरुणांनी संघटनेच्या कार्यात मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत.

माणगाव येथील समाजाच्या प्रशस्त सभागृहात नुकत्याच झालेल्या वार्षिक अधिवेशनात समाजाच्या भविष्यातील वाटचालीसंदर्भात विविध महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. याच अधिवेशनात नव्या कार्यकारिणीची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे निवडण्यात आली आहे. अध्यक्ष मंगेश सावंत, कार्याध्यक्ष प्रशांत अधिकारी, उपाध्यक्ष बळीराम लाड, संतोष शेलार, सचिव संजोग मानकर, खजिनदार सुधीर खैरे, सहखजिनदार विश्वास खानविलकर, सहसचिव प्रमोद दळवी अधिवेशनात माजी पदाधिकारी, ज्येष्ठ समाजबांधव आणि उपस्थित मान्यवरांनी नूतन कार्यकारिणीचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# रानभाज्या विक्रीतून आदिवासी महिलांचा उदरनिर्वाह

| तळा | प्रतिनिधी |

पावसाळ्याला सुरुवात झाल्याने पावसाळी रानभाज्या तळा बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. ज्यामध्ये कुड्याच्या शेंगा, शेवळा, भारांगी टाकला आदी भाज्यांचा समावेश आहे. या भाज्यांचा कोणताही बियाणा नाही आणि त्यांची लागवडही केली जात नाही तर सुरुवातीच्या पावसाच्या पाण्यावर या भाज्या नैसर्गिकरित्या बहरतात. या भाज्यांचे विविध औषधी गुणधर्म असल्याने बाजारात त्यांना मोठी मागणी असते. कुड्याच्या शेंगा व भारांगी या खायला कडवट असल्या तरी त्यांच्या औषधी गुणांमुळे शरीराला त्याचे मोठे फायदे आहेत. या भाज्यांचा आहारात समावेश केल्याने शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते, अंगावर असलेले डाग, खाज, खरूज, यांसारख्या अनेक व्याधींवर या भाज्या गुणकारी ठरतात. या भाज्यांना बनविण्याची देखील वेगवेगळी पद्धत आहे.



कुड्याच्या शेंगा, भारांगी, टाकला या भाज्या चिरून शिजविल्या जातात व त्यानंतर त्यांतील पाणी वेळून सुगरणी या भाज्या आपापल्या पध्दतीने बनवितात. परंतु शेवळा भाजी विशिष्ट पद्धतीने बनविली जाते. शेवळाचा बाहेरील भाग काढून त्यातील मूळ भाग चिरून घेऊन शिजविला जातो. व शिजविताना त्यामध्ये नाण्याचा पाळा टाकतात. शेवळाची भाजी बनविताना नाण्याचा पाळा कमी पडला तर शेवळा घशाला खवखवतो त्यामुळे जाणकार सुग्राणीच शेवळाची भाजी व्यवस्थितरीत्या बनवितात. तालुक्यातील आदिवासी महीला पावसाच्या सुरुवातीस जंगलात नैसर्गिकरित्या निर्माण होणाऱ्या या भाज्या विक्रीसाठी घेऊन येतात तसेच या भाज्यांना बाजारात मोठी मागणी असल्याने या महिलांना रोजगार उपलब्ध होतो. या भाज्या विकून मिळणाऱ्या पैशांतून आदिवासी महिला आपला उदरनिर्वाह भागवितात.

# तळा मराठी शाळा स्पर्धा परीक्षेत अव्वल

| तळा | प्रतिनिधी |

शैक्षणिक वर्ष २०२५/२६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध शासकीय स्पर्धा परीक्षेत तळे मराठी शाळेने अभिमानास्पद कामगिरी करून जिल्ह्यात लौकिक वाढवला आहे. यावर्षी तळे मराठी शाळेतील आरुषी बोडखे, प्रार्थना ठमके, प्रज्ञा महाजन या विद्यार्थिनीची नवोदय प्रवेश परीक्षा पात्र होऊन त्यांची निवड झाली आहे. काव्या कांबळेकर व हर्ष पिंपळे याची नवोदय विद्यालयात निवड झाली आहे. सलग ७ व्या वर्षी शाळेने यश मिळवले आहे. त्यानंतर शिष्यवृत्ती परीक्षेत आरुषी बोडखे, साईश लोखंडे, प्रार्थना ठमके, अर्जुन पवार, तन्मय भोईर, अनन्या फुलारे व आदर्श म्हस्के यांनी यश प्राप्त केले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाची परंपरा सलग सातव्या वर्षी कायम राखली आहे. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत या शाळेची विद्यार्थिनी प्रांजल प्रकाश ढाकणे हिची लेव्हल ३ साठी राज्यस्तरावर निवड झाली असून उत्तुंगतेज बालवैज्ञानिक परीक्षेत श्रुती इंगळे, दिक्षा मिनमीने, आरोही मंडलिक यांनी यश प्राप्त केले आहे. या मुलांना सुनील बैकर यांचे मार्गदर्शन मिळाले.

**२ जुलैपासून व्हॉट्सॲप हेल्पलाईन सुरु** | **समस्या प्रत्यक्ष ऐकून घेण्यासाठी 'जनता दरबार'**

# उरणकरांच्या तक्रारी आता थेट नगरपरिषदेकडे

| उरण | प्रतिनिधी |

उरण शहरातील नागरिकांना नागरी सुविधांशी संबंधित किरकोळ अथवा गंभीर समस्यांसाठी वारंवार नगरपरिषद कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, त्यांच्या तक्रारी थेट प्रशासनापर्यंत पोहोचाव्यात आणि त्यावर तातडीने कार्यवाही व्हावी, या उद्देशाने उरण नगरपरिषदेने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी २ जुलैपासून ८६५७३२०७६८ हा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. १३ जुलै रोजी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेण्यासाठी 'जनता दरबार' आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. या दोन्ही उपक्रमांमुळे नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे.



उरण तालुक्याचा औद्योगिक, व्यापारी आणि नागरी विस्तार गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात झाला आहे. जेएनपीए, विविध औद्योगिक प्रकल्प आणि वाढती लोकसंख्या यामुळे शहराचा विस्तार वेगाने होत असला, तरी त्या तुलनेत मूलभूत नागरी सुविधांचा विकास झालेला नसल्याची तक्रार नागरिक सातत्याने करत आहेत. अनेक भागांमध्ये रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याचा अनियमित पुरवठा, तुंबलेली गटारे, बंद पथदिवे, कचऱ्याची समस्या, पावसाळ्यातील जलभराव आणि स्वच्छतेचा अभाव यांसारख्या समस्या आजही कायम आहेत. पावसाळा सुरू झाल्यानंतर या समस्यांची तीव्रता आणखी वाढत असून नागरिकांना रोजच्या जीवनात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

नगरपरिषदेकडे तक्रार करण्यासाठी नागरिकांना अनेकदा प्रत्यक्ष कार्यालयात जावे लागते. काही वेळा तक्रारींचे निराकरण होण्यास विलंब होत असल्याचीही नाराजी व्यक्त केली जाते. या पार्श्वभूमीवर नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी व्हॉट्सॲप हेल्पलाईन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## निवडक



### अक्कादेवी धरण परिसरात वृक्ष लागवड

**चिरनेर** : हरित क्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने १ जुलै हा दिवस राज्यात कृषी दिन साजरा केला जातो. या कृषी दिनानिमित्त चिरनेर ग्रामपंचायतीच्या वतीने आणि जिजामाता महिला शेतकरी गट तसेच इंद्रायणी महिला शेतकरी गटाच्या सहभागातून बुधवारी (दि.१) चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या अक्कादेवी धरणाच्या माळरानावर व आदिवासी वाडी परिसराच्या क्षेत्रात विविध प्रकारची २०० रोपे लावून वृक्षरोपणाचा भव्य उपक्रम यशस्वी केला. या उपक्रमात फळझाडे व औषधी झाडांची लागवड करण्यात आली आहे. यात कडुलिंब, वड, पिंपळ अशा ऑक्सिजन देणाऱ्या झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे. निसर्गाचा समतोल राखण्याबरोबरच या वृक्षांचे फायदे पुढच्या पिढीला व्हावेत हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून चिरनेर ग्रामपंचायतीच्या वतीने या झाडांची लागवड करण्यात आली आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी माजी उपसरपंच सचिन घबाडी ग्रामविकास अधिकारी रवींद्र गावंड, सहाय्यक कृषी अधिकारी सुषमा गायकवाड, कर्मचारी मानसी म्हात्रे, योगिता केणी, संताजी ठाकूर, सुनील ठाकूर यांच्यासह जिजामाता महिला शेतकरी गटाच्या व इंद्रायणी महिला शेतकरी गटाच्या सदस्या उपस्थित होत्या.



### प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात वृक्षारोपण

**खोपोली** : कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि राज्याच्या हरितक्रांतीचे जनकवसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित होणारा कृषी दिन सहयोगी संशोधन संचालक डॉ. बी.डी. वाघमोडे यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक वृक्षारोपण कार्यक्रम घेऊन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी वसंतराव नाईक यांच्या ऐतिहासिक कार्याचा नेटक्या शब्दात आढावा घेतला. 'एक पेड माँ के नाम' अभियानाची आठवण ठेवून प्रत्येकाने वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धन करण्याचा ध्यास घ्यावा, असे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. महेंद्र गवई, डॉ. नामदेव म्हसकर, डॉ. मीनाक्षी केळुस्कर, डॉ. जीवन कदम, महेशकुमार, ज्ञानेश्वर पाटील, अथर्व शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले.

### विनय वेखंडे शेतीनिष्ठ पुरस्काराने सन्मानित

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील प्रगत शेतकरी म्हणून विविध प्रकारची शेती करणारे विनय वेखंडे यांचा राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने शेतीनिष्ठ शेतकरी म्हणून सन्मानित करण्यात आले.महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने राज्यातील शेतकऱ्यांना आज शेतीनिष्ठ शेतकरी आणि कृषी भूषण शेतकरी यांना राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. कर्जत तालुक्यातील विनय मारुती वेखंडे हे गेली ४० वर्षे वेगवेगळ्या प्रकारची शेती करीत असतात. त्यांना कृषी विभागाचा शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर झाला होता आणि आज कृषी दिनी शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार विनय वेखंडे यांना राज्याचे राज्यपाल विष्णू देव वर्मा यांचे हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.त्यावेळी वेखंडे यांच्या पत्नी आणि शेतीमध्ये सक्रिय राहून शेतीची मशागत करणाऱ्या छाया वेखंडे या देखील सोबत हिवत्या. मुंबई येथील वरळी डोम येथे आयोजित कार्यक्रमाला राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंह आणि कृषी आयुक्त सुरज मांढरे आदी उपस्थित होते.





### चिरनेर प्राथमिक शाळेत वह्यावाटप

**चिरनेर** : विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये मदत करता यावी, यासाठी गेल्या अनेक वर्षापासून शिवधन पतसंस्थेच्या वतीने विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत उरण तालुक्यातील चिरनेर येथील राजिप प्राथमिक केंद्र शाळेत शिवधन पतसंस्थेच्या वतीने बुधवारी (दि.१) वह्या करण्यात आल्या. यावेळा पहिली ते चौथी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी चार वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संतोष ठाकूर यांनी भूषविले होते. याप्रसंगी सरपंच भास्कर मोकल, शिवधन पतपेढीचे चेअरमन गणेश म्हात्रे, गजानन वशेणीकर, बळीराम पाटील, दीपक पाटील, अशोक फोफेरकर,अमित चिर्लेकर, रंजना म्हात्रे, समाधान ठाकूर, निकिता नारंगीकर, निलम चौलकर हिम्मत केणी, मेघा चिर्लेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश म्हात्रे यांनी केले, तर सूत्रसंचालन निर्भय म्हात्रे यांनी केले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रशस्त ३००० चौरस फूट खुला हॉल ऑफिशिअल कामासाठी भाडेतत्त्वावर देणे आहे. गरजूनी संपर्क करावा. संपर्क – ९२२६३७९८४४ / ९८२३९२७२८८
- किहीम बिच येथे जागा विकणे आहे. संपर्क : ९४०३५६१४८१, ८१४९२४९९४७
- वॉन्टेड :- अलिबागमधील दवाखान्यामध्ये वृद्ध महिलेला सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत काळजीवाहू सेविका भेटा किंवा पगाराचे अपेक्षासह लिहा. सुधाकर रानवडे, अन्नपूर्णावाडी, हरिष बेकरीजवळ चेंढरे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)